
# हाकारा

## 'प्रा. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक'



वर्ष - अकरावे : अंक - चौथा ऑक्टोबर - डिसेंबर १९९०



नवविचारांच्या प्रणेत्यांना स्वतःच्या पूर्वग्रहांशी
तर झगडावे लागतेच. पण त्याबरोबर प्रस्थापित
हितसंबंधांचा कडवा विरोध वारंवार सहन करावा
लागतो. त्या वेळी विचारवंतांची खरी कसोटी
असते. म्हणून आपल्या भूमिकेचे पावित्र्य राख-
ण्यासाठी पडेल ती किंमत द्यावयास जो तयार
असेल तो खरा नैष्ठिक विचारवंत असे म्हटले पाहिजे.

गंगाधर बाळकृष्ण सरदार

पुणे २० एप्रील १९८७

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## 'प्रा. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक'

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय : प्रा. सरदार - एक कृतिशील विचारवंत | |
| २) | सामाजिक क्रांतीचे अग्रदूत - महात्मा फुले व डॉ. आंबेडकर (दोन मुलाखती) : प्रा. गं. बा. सरदार | ४ |
| ३) | प्रा. सरदारांची मुलाखत : डॉ. हे. वि. इनामदार | १० |
| ४) | प्रबोधनाची मशाल निमाली : डॉ. भालचंद्र फडके | १५ |
| ५) | प्रा. सरदार - प्राध्यापकांच्या सामाजिक बांधिलकीचा आदर्श : प्रा. देवदत्त दाभोळकर | २० |
| ६) | आदिवासी साहित्याविषयी प्रा. सरदारांची भूमिका : ग. शां. पंडित | २६ |
| ७) | प्रा. गं. बा. सरदारांच्या काही आठवणी : शंकरराव खरात | ३० |
| ८) | आठवणी अण्णांच्या : डॉ. हे. वि. इनामदार | ३३ |
| ९) | ऐसे बोलणे मनी साठवावे : गजानन शं. खोले | ३६ |
| १०) | लामणदिवा लावण्यापूर्वीच विझला : प्रा. ए. एम. मोदी | ४० |
| ११) | गं. बा. सरदार - प्रबोधनाचे प्रवक्ते : ॲड. के. डी. पाटील | ४३ |
| १२) | गं. बा. सरदार - साहित्य सूची : संगीता पुराणिक | ४४ |



वर्ष - अकरावे : अंक - चौथा
ऑक्टोबर-डिसेंबर १९९०
पत्र व्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११००७

संपादक
रामचंद्र मुटाटकर
संपादन सहाय्य
ग. शां. पंडित

प्रकाशक - रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
संजीव मुद्रणालय
४६९, सदाशिव पेठ
पुणे - ४११०३० फोन - ४४५०८२
येथे छापून प्रसिध्द केले.


'हाकारा'स महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र यांजकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

## संपादकीय

# प्रा. सरदार : एक कृतिशील विचारवंत

महाराष्ट्रातील एक अग्रगण्य विचारवंत, ज्येष्ठ साहित्यिक, पुरोगामी चळवळीचे भाष्यकार, आधुनिक प्रबोधनाचे प्रवक्ते, व्यासंगी साहित्यिक आणि प्रभावी वक्ते, समाजमनस्क विचारवंत अशा विविध विशेषणांनी प्रा. सरदारांना संबोधले जाते. परंतु ही सर्व विशेषणे म्हणजे सरदारांची एक बाजू दाखविणारी आहेत, असे मला वाटते. कारण प्रा. सरदार हे फक्त साहित्यिक किंवा विचारवंत नव्हते तर ते कृतिशील विचारवंत होते. कृती आणि विचार यांची सांगड त्यांनी घातलेली होती. सरदारांच्या या दुसऱ्या बाजुचेच दर्शन प्रथम आम्हाला झाले- १९७६ मध्ये आमच्या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना झाली, आणि त्याचवर्षी ठाणे जिल्ह्यातील जव्हार येथे 'आदिवासींच्या शिक्षणविषयक समस्या' या विषयावर एक शिबीर आयोजित केले होते. या शिबीरासाठी पुणे विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर व प्रा. सरदार यांना बोलावले होते. सरदार दाभोळकरांबरोबर येणार होते. परंतु काही कारणास्तव दाभोळकरांनी येत नसल्याचे कळविले. त्यामुळे सरदारही येणार नाहीत असेच आम्ही गृहीत धरले. परंतु आश्चर्य असे की, सरदार आपली प्रकृती ठीक नसतानाही एस.टीने जव्हारला आले व शिबीराला उपस्थित राहिले. नंतर प्रा. दाभोळकरही दिल्लीहून परस्पर जव्हारला आले.

सरदारांचा जन्म जव्हारचाच, त्यामुळे बालपणापासूनच वारली, ठाकूर, महादेव कोळी, कोकणा या आदिवासींशी त्यांचा संबंध आला. आदिवासींच्या दारिद्र्याचे दर्शन त्यांना तेव्हापासूनच घडले. वडिलांचा व्यवसाय व्यापार व सावकारीचा असल्यामुळे त्यांच्याकडे नेहमीच आदिवासींची ये-जा असायची. या गरीब आदिवासींबद्दल त्यांच्या वडिलांना फार सहानभुती होती.हा सहानभुतीचा वारसा त्यांना वडिलांकडूनच मिळाल्याचे त्यांनी म्हटले आहे. जव्हार सोडून पुण्यात राहायला येताना सरदारांच्या वडिलांनी आदिवासींचे ऋण म्हणून त्यांच्याकडे असलेल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परत केल्या व त्यांच्या कल्याणासाठी आपल्या मिळकतीचा काही भाग बाजूला काढून त्याचा ट्रस्ट केला. वडिलांच्या या समाजऋणाच्या जाणीवेचे संस्कार सरदारांच्या विचारांतून व त्यांच्या कृतीतून दिसून येतात.

आदिवासींविषयी, त्यांच्या दारिद्र्याविषयी सरदारांना विलक्षण तळमळ होती. आणि म्हणूनच आम्ही त्यांना आमच्या परिषदेचे अध्यक्ष होण्याची विनंती केली. शरीर अस्वास्थामुळे त्यांनी कोणतीही जबाबदारी स्वीकारण्याचे टाळले होते, परंतु परिषदेचे अध्यक्षपद मात्र त्यांनी २ वर्षाकरिता स्वीकारले. अध्यक्ष झाल्यानंतर सरदारांनी परिषदेच्या व्यवहारात लक्ष घातले पण कसलीही ढवळाढवळ त्यांनी केली नाही. परिषदेच्या कार्यकारी मंडळाला स्वायत्तपणे काम करण्याची मोकळीक व निर्णय स्वातंत्र्य त्यांनी दिले होते. कार्यकारिणीच्या सर्व सभा त्यांच्या आग्रहामुळे त्यांच्या घरीच होत. तब्येत ठीक नसतानाही या सभांना ते मार्गदर्शन करीत. मुळातच त्यांच्याबद्दल आदर असल्यामुळे परिषदेसंबंधी त्यांनी केलेल्या प्रगट चिंतनाचा व सूचनांचा आम्ही गांभीर्यपूर्वक विचार केला. त्यांच्या अध्यक्षाच्या कारकीर्दीत नवोदित आदिवासी साहित्यिकांचे प्रशिक्षण शिबीर, महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र, वनविकास महामंडळाचे शिबीर इत्यादी कार्यक्रम झाले. परिषदेच्या प्रत्येक कार्यक्रमाविषयी त्यांनी अचूक व बहुमोल मार्गदर्शन केले. चर्चासत्राच्या अध्यक्षपदावरून बोलताना,

समारोप करताना हातात कोणतेही टिपण न ठेवता प्रत्येक वक्त्याच्या ठळक मुद्द्यांचा परामर्श नावासकट घेणे ही आश्चर्यचकित करणारी वस्तुस्थिती आहे. हिशोबाचा तपशील, सभांचा तपशील या विचारवंताच्या ध्यानात कसा राहू शकतो याचा विस्मय वाटतो.

एखाद्या व्यक्तिविषयी बोलताना सरदार कधीही टोकाची भूमिका घेत नसत. काळानुसार व्यक्तिमत्त्व घडते अशी त्यांची भूमिका होती. ज्यांच्याशी सरदारांचा संबंध आला, त्यांना सरदारांविषयी अतिशय प्रेम, आत्मीयता व जिव्हाळा असल्याचे दिसून येते. पुढील लेखांवरून याची आपणास प्रचीती येईलच.

दोन ऑक्टोबर हा सरदारांचा जन्मदिवस. या दिवसाला अतिशय महत्व आहे. कारण हाच राष्ट्रपिता म. गांधीचा व भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींचा जन्मदिवस. त्यामुळेच की काय, गांधींची विचारसरणी व शास्त्रींची साधी राहणी या दोन्हींचा मिलाप सरदारांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला दिसून येतो. समन्वयवृत्ती, समतोल, समग्रलक्षी व मानवतावादी दृष्टि, निस्पृहता व खंबीरपणा या गोष्टी सरदारांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आहेत.

१९८३ साली सरदारांचा ७५ वा वाढदिवस परिषदेतर्फे साजरा करण्यात आला व त्यानिमित्त 'हाकारा' चा 'प्रा. सरदार गौरव विशेषांक' काढण्यात आला होता.

सरदार अध्यक्ष असतानाच त्यांनी आदिवासी प्रश्नांना वाहिलेले नियतकालिक परिषदेने सुरू करावे हा विचार उचलून धरला व १९८० साली 'हाकारा' मासिक सुरू झाले. 'हाकारा' हे नाव त्यांनीच सुचविले. 'हाकारा' बंद पडू नये. त्याची दशकपूर्ती झालेली पहावी, अशी सरदारांची तीव्र इच्छा होती, पण ती अपुरीच राहिली. आणि तीच स्मृति म्हणून हा अंक काढण्यात येत आहे. 'हाकारा' चा अर्थ साद घालणे, एकजूट करणे. सगळ्या लोकांनी एकत्र येऊन एकजूट करावी, साद घालावी तरच आदिवासींच्या समस्या सुटण्यास मदत होईल ही भावना 'हाकारा' मागे सरदारांची होती. चर्चासत्रांच्या, शिबीरांच्या निमित्ताने प्रा. सरदारांनी जी मार्गदर्शनपर भाषणे केली ती 'हाकारा' मधून लेखरूपाने प्रसिध्द झाली. १९८७ साली सरदारांच्या निबंधांचा संग्रह 'नव्या ऊर्मी नवी क्षितिजे' या नावाने ल. रा. नसिराबादकर यांनी संपादित केला व त्यात 'हाकारा' तील सरदारांच्या तीन लेखांचा समावेश केला.

प्रा. सरदार हे मराठी साहित्याचे अभ्यासक म्हणून प्रसिध्द असले तरी त्यांचे विश्लेषण समाजशास्त्रीय होते. मराठीचा अभ्यास व समाजशास्त्राचा व्यासंग यामुळेच त्यांना 'समाजमनस्क विचारवंत' म्हटले जाते. ते काही दिवस पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्राच्या अभ्यास मंडळावर होते. एक मराठीचा प्राध्यापक समाजशास्त्राच्या अभ्यासमंडळावर ही घटना प्रथमच घडली.

परिषदेचा अध्यक्ष हा आदिवासीच असावा असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या सूचनेवरून त्यांच्यानंतर परिषदेचे अध्यक्षपद श्री. जनार्दन वळवींकडे गेले. सरदार स्वत: आदिवासी नसले तरी त्यांचे बालपण आदिवासींमध्ये गेले व उर्वरित आयुष्याची काही वर्षे त्यांनी परिषदेमार्फत आदिवासींमध्येच व्यतीत केली. म्हणजे आदिवासींचा ऋणानुबंध त्यांनी पाळला.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ही संस्था त्यांनीच घडविली व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली वाढली. सरदार आज जरी आमच्यात नसले तरी त्यांची स्मृति सतत आम्हाला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणार आहे.

त्यांच्या स्मृतिला आमचे विनम्र अभिवादन.

रा. के मुटाटकर

# सामाजिक क्रांतीचे अग्रदूत

( प्रा. सरदारांच्या दोन मुलाखती )

## १. महात्मा जोतीराव फुले

### धर्मासंबंधी भूमिका

"निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक
भांडणे अनेक कशासाठी ?"

महात्मा फुले यांची धर्मासंबंधी भूमिका या छोट्या अवतरणात चांगल्या प्रकारे व्यक्त झाली आहे, असे सांगून प्रा. सरदार म्हणाले, "सत्यशोधक समाज स्थापण्यामागील त्यांची प्रमुख प्रेरणा केवळ धर्मसुधारणेची नसून आपल्या धर्मविषयक कल्पनेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची होती. एकेश्वरवादाचे ते पुरस्कर्ते होते. ईश्वर एक आहे तर मग अनेक धर्म कशासाठी ? त्यातून कलह निर्माण होतात असे त्यांचे मत होते. त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्मा'चा पुरस्कार केला. त्यातील 'सार्वजनिक' शब्दाचा त्यांचा अर्थ सार्वत्रिक, देशकालातीत म्हणजेच सर्व देशातील, काळातील आणि जमातीतील लोकांना सामावून घेणारा असा होता. धर्मासंबंधी त्यांची मते संकुचित नव्हती. आपल्या खेड्यात बहुदेववादाचे अतोनात प्रस्थ असल्यामुळे त्यांची ही एकेश्वरवादाची शिकवण बहुजनसमाजाच्या धार्मिक जीवनात नव्या जाणिवा निर्माण करण्यास पोषक होती. विशुद्ध धर्मभावनेला छेद देणाऱ्या संस्थात्मक धर्मातील बाह्य अवडंबरावर, धर्मभोळेपणावर, अंधश्रद्धेवर, अनाचारावर आणि पुरोहितशाहीवर त्यांनी जोरदार हल्ला चढविला. धर्म व्यक्तीपुरता राहिला पाहिजे, असे त्यांचे मत होते. एक भाऊ हिंदू, दुसरा बौद्ध, तिसरा ख्रिस्ती, सारे एका कुटुंबात परस्परांच्या धर्मबुद्धीबद्दल आदर ठेवून खेळीमेळीने एकत्र राहू शकले पाहिजेत. धार्मिक कलहाने आणि दंगलींनी आपल्या देशातील वातावरण अजूनही वारंवार दूषित होते. अशा स्थितीत ऐंशी-नव्वद वर्षांपूर्वी महात्मा फुले यांनी दिलेली ही शिकवण आपण निरंतर आत्मसात करण्याची फार मोठी निकड आहे."

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमागे दुसरी मोठी प्रेरणा दलितोद्धाराची होती असे सांगून प्रा. सरदार म्हणाले, "लोकसेवा म्हणजे ईश्वरसेवा या भावनेने जोतिबांनी आपल्या सार्वजनिक कार्यास प्रारंभ केला. केवळ आपल्या जातीचे हित पाहण्याची त्यांची वृत्ती कधीच नव्हती. समाजातील दलित आणि उपेक्षित गटांना वर आणले पाहिजे, या तळमळीतून त्यांनी मुलींची शाळा काढली, पुनर्विवाह रुढ व्हावा म्हणून प्रयत्न केले, बालहत्याप्रतिबंधक गृह स्थापन केले. एवढेच करून ते थांबले नाहीत तर त्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा काढली, त्यांच्यासाठी आपल्या घरचा हौद खुला केला, समाजबाधवांनी त्यांना बरोबरीच्या नात्याने वागवावे म्हणून सतत आवर्जून प्रचार केला. जनसेवेची, दलितोद्धाराची ही प्रेरणा त्यांना ख्रिस्तप्रणीत मानवतावादाचे जे प्रात्याक्षिक ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या जीवनकार्यात दिसले त्यातून मिळाली. 'ख्रिस्ताळलेले' म्हणून जोतिबांवर टीका झाली, पण दादोबा पांडुरंग, राम बाळकृष्ण, आत्माराम पांडुरंग, डॉ. भांडारकर, न्या. रानडे वगैरे त्या वेळच्या बहुतेक सर्व सुधारकांना डॉ. विल्सन, स्टीव्हेन्सन, मिचेल प्रभृती मिशनऱ्यांच्या कार्यापासून प्रेरणा मिळाली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. जोतिबांच्या सार्वजनिक कार्याच्या पूर्वकाळात त्यांची भूमिका प्रामुख्याने मानवतावादाची होती. शिक्षण आणि सेवा याच्याद्वारे त्यांनी दलितांच्या कल्याणासाठी, स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्न केले. ते करीत असताना नुसत्या शाळा काढून लोकांचे दैन्य हटणार

नाही. त्यासाठी धार्मिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरी नष्ट केली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. पुरोहित, धर्मशास्त्रज्ञ, सरकारी अंमलदार आणि सावकार यांच्या स्वार्थी आणि जुलमी वृत्तीवर त्यांनी प्रखर हल्ला केला. या सर्व सत्तास्थानांवर बव्हंशी ब्राह्मण असल्याने वरवर हा हल्ला ब्राह्मणांवर दिसला, तरी त्याचा खरा रोख वरिष्ठ जातींच्या अन्यामूलक वर्चस्वावर होता. ''

हे करीत असताना त्यांना आपल्या सामाजिक जीवनातील कठोर वास्तवाची, सामाजिक गुलामगिरीची, नित्याच्या व्यवहारातील अन्यायाची व विषमतेची तीव्रतेने जाणीव झाली. बहुजनसमाजाच्या हलाखीच्या स्थितीचा विचार करताना त्यांना या दु:स्थितीचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत, धर्मसंस्थेत आहे, असे कळून आले. समाज हा एकात्म नाही. तो दुभंगलेला आहे. तेव्हा समाजाचे हित म्हणजे कोणाचे हित असा सवाल त्यांनी लोकांपुढे टाकला. ब्राह्मण आणि शूद्र, सावकार आणि शेतकरी यांचे हित एक आहे, असे म्हणता येत नाही. आपला एकंदर सामाजिक व्यूहच शोषक आणि शोषित उच्चवर्णीय आणि शुद्रातिशूद्र यांच्यातील अंतर्विरोधावर आधारलेला आहे हे त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या मनावर ठसविण्याची पराकाष्ठा केली.

## स्वावलंबनावर भर

शूद्रतिशूद्रांना जागृत व संघटित करताना त्यांनी त्यांना स्वावलंबनाचा संदेश दिला. आपले नैसर्गिक मानवी हक्क आपण स्वत:च्या बळावर मिळविले पाहिजेत, त्यासाठी उच्चवर्णीयांच्या मेहेरबानीवर विसंबून राहता कामा नये, आपला आपणच उद्धार केला पाहिजे. आपल्या सर्वांगीण विकासासाठी आपणच प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे त्यांनी वारंवार निक्षून सांगितले. जन्मसिद्ध उच्चनीचभावामुळे, बहुजनसमाजात पिढ्यान् पिढ्या भिनलेला न्यूनगंड आणि प्रारब्धवाद नाहीसा करण्याचा त्यांचा निर्धार होता. यासाठी त्यांनी सर्व शूद्र समाजाला, अस्पृश्यांना आपल्या सख्ख्या भावाप्रमाणे आपुलकीने वागविण्याचा उपदेश केला. त्याच्या मुळाशी शोषित वर्गाची एकजूट घडवून आणण्याची व टिकविण्याची भावना होती.

जोतिबांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी खेड्यांतील शेतकरीवर्गात आणि नारायणराव लोखंडे यांनी मुख्यत: औद्योगिक कामगारांच्या कल्याणासाठी कार्य केले. लेख, सभा, मेळावे, पोवाडे, भजने, पदे यांच्याद्वारे भालेकरांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याचा व त्यांची संघटना उभारण्याचा प्रयत्न केला, तर लोखंडे यांनी गिरणी कामगार महामंडळ स्थापून कामगारांचे हक्क सुरक्षित राखण्याची दक्षता घेतली व त्यांना जरूर त्या सवलती मिळवून देण्याचा उपक्रम केला. महाराष्ट्रात शेतकरी व कामगार या वर्गांच्या चळवळीची सुरुवात या दोन नेत्यांनी केली. पुढे कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी शाळा, अस्पृश्य व इतर जमातींची वसतिगृहे काढणे, शैक्षणिक सवलती देणे, अस्पृश्य बांधवांना नोकरी, व्यापार यांसारखे व्यवसाय उपलब्ध करून देणे या मार्गाने राजसत्तेद्वारे करता येईल तेवढे शिक्षणप्रसाराचे व अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. अशा प्रकारे महात्मा फुले यांचे कार्य पुढे कसे चालू राहिले ते प्रा. सरदार यांनी विशद केले.

सत्यशोधक समाजाच्या कार्याला १९१७ नंतर जे निराळे वळण लागले, त्यासंबंधी बोलताना प्रा. सरदार म्हणाले, ''मॉंटेग्युचेम्सफर्ड सुधारणा आल्यानंतर येथे सत्तासंघर्षाचे राजकारण सुरू झाले. सत्तासंपादनाची प्रेरणा तत्त्वत: निषिद्ध मानण्याचे काहीच कारण नाही. पण सत्तेचा वापर करून समाजहित साधवयाचे असेल तर त्यामागे राजकीय ध्येयवाद हवा, समाजपरिवर्तनाची आच हवी. असा ध्येयवाद आणि तळमळ

नसेल तर संधिसाधू पुढाऱ्यांचे फावते आणि चळवळीचे मूळ उद्दिष्ट लोप पावते. या काळात सत्यशोधक समाजाच्या चळवळीला असेच काहीसे अनिष्ट वळण लागले. या चळवळीत काही प्रामाणिक व लोकहिताची तळमळ असणारे कार्यकर्ते असले तरी एकंदर प्रवाह निषेधपरतेनेच ग्रासलेला होता. त्यामुळे सामाजिक दुहीला खतपाणी मिळून सत्यशोधक समाजाचे प्रचारकार्यात ब्राह्मणविरोधाचेच प्राबल्य झाले. मात्र या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादातील अनिष्ट प्रवृत्तींना ब्राह्मणेतर पुढाऱ्यांइतकेच ब्राह्मण नेतेही जबाबदार आहेत. त्यांच्या अदूरदर्शीपणामुळे व अनुदार वृत्तीमुळे जातीय प्रवृत्ती बळावत गेल्या हे नाकारता येत नाही.''

## दुहेरी साधनेत खंड

''वर्णवर्चस्वाविरुद्ध सत्यशोधक समाजाने चालविलेला झगडा हा वस्तुत: न्याय्यच होता. पण त्यासाठी त्यांनी अंगीकारलेली विचारसरणी अधिक व्यापक व पायाशुद्ध असावयास हवी होती. उच्चवर्णीयांनीही या नव्या जागृतीचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न करावयास हवा होता. या चळवळीतील अपप्रवृत्तींवर बोट ठेवून लोकांच्या न्याय्य आकांक्षांकडे दुर्लक्ष करणे इष्ट नव्हते. पण या बाबतीत उभय पक्षी पुरेशी दक्षता घेतली गेली नाही. एकमेकांवर दोषारोप करण्यातच पुढाऱ्यांनी आपली शक्ती खर्च केली. अन्यायाविरुद्ध झगडणे आणि अंतर्मुख वृत्तीने आपल्यातील दोष काढून टाकणे या महात्मा फुल्यांच्या दुहेरी साधनेत या कालावधीत खंड पडला'' असे खेदोद्गार प्रा. सरदार यांनी काढले.

सत्यशोधक चळवळीतील गुणदोषांचा विचार करताना आणखी एक गोष्ट नमूद केली पाहिजे. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, माधवराव बागल यांच्यासारखे राजकीय नेते, श्रीपतराव शिंदे, प्रबोधनकार ठाकरे आणि वा. रा. कोठारी यांच्यासारखे धुरंधर पत्रकार आणि महर्षी अण्णासाहेब शिंदे, भाऊराव पाटील आणि बाबूराव जगताप यांच्यासारखे निष्ठावंत समाजसेवक या चळवळीतून उदयास आले. महाराष्ट्राला मिळालेली या आंदोलनाची ही देणगी आहे, असे म्हणावयास हरकत नाही, असे सांगून महर्षी शिंदे-केशवराव जेधे आदी नेत्यांच्या एका महत्त्वाच्या कार्याकडे लक्ष वेधताना प्रा. सरदार म्हणाले, ''या नेत्यांनी सत्यशोधक समाजातील बहुसंख्य लोकांना काँग्रेसमध्ये आणले. राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहाला सत्यशोधक समाजाचा प्रवाह येऊन मिळाला, ही कामगिरी नि:संशय मोठी आहे.''

दलितांवरील अन्यायाचे निर्मूलन, शोषकवर्गाच्या शोषणापासून श्रमिकांची मुक्तता आणि जातिधर्मनिरपेक्ष भावनिक एकात्मतेवर आधारलेल्या निकोप सामाजिक जीवनाची उभारणी हे सत्यशोधक समाज स्थापण्यामागे जोतिबांचे विविध उद्दिष्ट होते. ते अजून साध्य झालेले नाही. आज आपल्या सामाजिक जीवनात पुनरुज्जीवनवादाच्या प्रवृत्ती डोकावत आहेत. दलित समाजावरील अत्याचाराचे उद्वेगजनक प्रसंग वारंवार घडत आहेत. महात्मा फुल्यांच्या ध्येयवादाशी ही परिस्थिति अत्यंत विसंवादी आहे, असे सांगून प्रा. सरदार म्हणाले, ''महात्मा फुल्यांचे आदर्श समाजाचे स्वप्न साकार होण्यासाठी त्यांची प्रेरणा कार्यकर्त्यांना आजही स्फूर्ती देत राहील. त्यांच्या शिकवणुकीमधील चिरंतन अंश आपण जपला पाहिजे आणि तात्कालीक अंश वगळण्याची खबरदारी घेतली पाहिजे. सर्वच मोठ्या नेत्यांच्या बाबतीत हे खरे आहे. शंभर वर्षापूर्वी त्यांनी मांडलेले विचार व दिलेली शिकवण आजच्या परिस्थितीत जशीच्या तशी लागू पडणे शक्य नाही. सामाजिक समता, बंधुभाव आणि शोषणमुक्ती ही त्यांची उद्दिष्टे साधण्यासाठी प्रतिगामी शक्तीविरुद्ध लढण्याची जिद्द आणि कठोर आत्मसंशोधन करून आपल्यातील अनिष्ट प्रवृत्ती काढून टाकण्यची तत्परता अशा दुहेरी भूमिकेची आजही आवश्यकता आहे.''

## २. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. आंबेडकरांपासून दलित पँथरपर्यंत दलितांच्या चळवळीतील प्रमुख प्रवाह व प्रवृत्ती यांचे प्रा. सरदारांनी या मुलाखतीत थोडक्यात विश्लेषण केले आहे.

### उपकार नको, हक्क हवेत

आंबेडकरपूर्व काळातील अस्पृश्यतानिवारण कार्याच्या स्वरूपासंबंधी बोलताना ते म्हणाले, साक्षरताप्रसार, दलितांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करणे अशा स्वरूपाचे हे कार्य होते. त्या मागची भावना माणुसकीची आणि बंधुभावाची असली, तरीदेखील या कार्याची मुख्य प्रेरणा बहुतांशी दलितोद्धाराचीच होती. मागासलेल्या दलित समाजाला वर आणण्यासाठी पुढारलेल्या सवर्णांनी केलेले विधायक कार्य ही त्याची मर्यादा होती. आंबेडकरांनी या चळवळीचे स्वरूप पार बदलून टाकले; तिला अगदी वेगळे वळण दिले. सवर्णांनी औदार्याने व उपकारबुद्धीने दिलेल्या लहान लहान सवलतींनी आता आमचे समाधान होणार नाही. समाजाचा एक घटक म्हणून दलितांचे मूलभूत न्याय्य हक्क पूर्णतया त्यांना मिळाले पाहिजेत अशी भूमिका त्यांनी स्वीकारली. दलितांमधील न्यूनगंड व लाचारी घालवून त्यांच्यात स्वत्वभावनेचा पीळ आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा आंबेडकरांनी प्रयत्न केला आणि आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा संघटितपणे प्रतिकार करण्याची त्यांना शिकवण दिली. दलितांमध्ये जागृती करीत असतानाच ब्रिटिश सरकार आणि सवर्णांच्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्याबरोबर वाटाघाटी करून अस्पृश्य समाजाचे जास्तीत जास्त हित साधण्याकडे त्यांनी लक्ष पुरविले. घटनेच्या मसुदा-समितीच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, संधी-समानता आणि भ्रातृभाव या तत्त्वांचा स्वतंत्र भारताच्या रचनेत अंतर्भाव करण्यात आला आहे. हा एका दृष्टीने आंबेडकरांच्या तत्त्वप्रणालीचा विजयच होय.

''सध्याच्या स्पर्धाप्रधान युगात राखीव जागांच्या, सवलतींच्या पांगुळगाड्यावर विसंबून दलित समाजाचा अखेरपर्यंत निभाव लागणार नाही. सामाजिक जीवनातून अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन होऊन दलितांना सवर्णांच्या बरोबरीने स्थान प्राप्त करून घ्यावयाचे असेल, तर हा पांगुळगाडा टाकून देऊन त्यांनी अल्पावकाशात स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तयारी केली पाहिजे; हे ओळखून त्यासाठी त्यांनी शिक्षणप्रसारावर विशेष भर दिला आणि दलित समाजाने जेथे जेथे संधी मिळेल तेथे तेथे तिचा पुरेपूर फायदा उठवून आपली गुणवत्ता आपण सिद्ध केली पाहिजे अशी अस्पृश्य समाजाला त्यांनी शिकवण दिली. प्रत्येक क्षेत्रात सवर्णांची बरोबरी आपण करू शकू अशी उमेद दलितांमध्ये निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश होता. विद्वत्ता आणि कर्तृत्व या दोन्ही बाबतींत समाजाच्या अगदी तळाच्या थरातील मनुष्य प्रयत्नांनी शिकस्त करून केवढी उंची गाठू शकतो, हे त्यांनी आपल्या उदाहरणाने जगाला दाखवून दिले. त्यामुळे बाबासाहेब हे साहजिकच लक्षावधी दलितांचे स्फूर्तिस्थान झाले; अस्पृश्य समाजातील नवतरूणांच्या अस्मितेचे व आकांक्षांचे प्रतीक बनले. निदर्शने, परिषदा, वृतपत्रे, शिक्षणसंस्था अशा वेगवेगळ्या साधनांचा त्यांनी लोकजागृतीसाठी तत्परतेने उपयोग करून घेतला-- ''

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरासंबंधी बोलताना प्रा. सरदार म्हणाले, ''धर्मांतराचा विचार आंबेडकरांनी प्रथम येवले येथे १९३५ साली प्रगट केला. पण प्रत्यक्ष सामुदायिक धर्मांतर त्यानंतर एकवीस वर्षांनी म्हणजे १९५६ साली नागपूर येथे केले. आपल्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेला बाध न आणता दलित समाजाच्या

विकासात कोणता धर्म पोषक होईल यासंबंधी त्यांच्या मनात दीर्घकाल चिंतन चालू होते. जुन्या परंपरागत रूढींमुळे हिंदू धर्मात अस्पृश्यांची सतत अवहेलना होत होती. समाजपरिवर्तन, सामाजिक समता व व्यक्तिविकास यांना आपल्या सामाजिक जीवनातील संस्था, श्रद्धास्थाने व रूढी प्रतिकूल होत्या. त्या दृष्टीने सामाजिक विषमतेचा व उच्चनीचभावाचा निषेध करणारा, पण भारतात उदय पावलेला बौद्ध धर्म त्यांना साहजिकच जवळचा वाटला. या धर्मांतरामुळे अस्पृश्यांचे सर्व आर्थिक व सामाजिक प्रश्न सुटले असे कोणीच म्हणणार नाही. पण अस्पृश्यतेमुळे दलित समाजात खोलवर रूजलेला मानसिक न्यूनगंड मात्र ताबडतोब नष्ट झाला. अस्पृश्यता आणि जातिभेद हे ज्या धर्माचे अविभाज्य विशेष होऊन राहीले आहेत, तो हिंदू धर्म आम्ही सोडला, तेव्हा आता आम्ही अस्पृश्य राहिलो नाही, अशी स्वाभिमानयुक्त नवी जाणीव या समाजात सर्वत्र फैलावली. ''

डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक भूमिकेसंबंधी प्रा. सरदार म्हणाले, ''इंग्लंड-अमेरिकेच्या विद्यापीठीय वातावरणात वावरल्याने डॉ. आंबेडकरांच्या मनावर पाश्चात्य उदारमतवादाचे दृढ संस्कार झाले होते. भारताची राष्ट्रीय एकात्मता अभंग राहिली पाहिजे याबद्दल त्यांना इतर मोठमोठ्या राष्ट्रीय नेत्यांइतकीच कळकळ होती. संसदीय लोकशाहीवर तर त्यांचा अढळ विश्वास होता. पण राजकीय पक्ष व कामगार संघटना यांचे नेते राजकीय व आर्थिक प्रश्नांवरच सर्व लक्ष केंद्रीत करून सामाजिक प्रश्नांची अगदीच उपेक्षा करीत होते, असा अनुभव त्यांना वारंवार आला.

## दोन प्रेरणांमधील हेलकावे

''अस्पृश्य समाजात प्रामुख्याने श्रमिकांचाच भरणा असल्याने त्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी कामगार वर्गाबरोबर सहकार्य करण्याची आवश्यकता डॉ. आंबेडकरांना जाणवली होती; म्हणून त्यांनी आरंभी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. परंतु कामगार संघटना अस्पृश्यांच्या सामाजिक गुलामगिरीच्या बाबतीत नेहमीच उदासीन राहतात, ही गोष्ट त्यांना स्वाभाविकपणेच खटकली, अर्थातच दलितांच्या प्रगतीसाठी त्यांना वेगळे व्यासपीठ उभे करावेसे वाटले व त्यांनी दलित फेडरेशनची स्थापना केली. पुन्हा आपल्या आयुष्याच्या अखेरीस रिपब्लिन पक्षाच्या निशाणाखाली आपल्या अनुयायांना संघटित करण्याचे त्यांच्या मनात होते. पण त्यांच्या मृत्यूनंतर हा पक्ष स्थापन झाला. सवर्णातील शोषित वर्गाबरोबर संयुक्त आघाडी आणि दलितांची स्वतंत्र संघटना या दोन प्रेरणांमधील हेलकावे येथील विशिष्ट परिस्थितीमुळे त्यांच्या धोरणात दिसून येतात. स्वातंत्र्योतर काळात घटनेने अस्पृश्यता नाहीशी झाल्याचे घोषित केले, तरी सवर्णांच्या मनोवृत्तीत आणि वागणुकीत मूलगामी परिवर्तन झाल्याचे त्यांना आढळून आले नाही. संसदीय लोकशाहीचा मार्ग त्यांनी श्रद्धापूर्वक स्वीकारला होता. परंतु मध्ययुगीन संस्कारांनी व समजुतींनी ग्रासलेल्या बहुसंख्य हिंदू समाजाचे मतपरिवर्तन होण्याची आशा त्यांच्या ठिकाणी राहिलेली नव्हती. सवर्ण आणि दलित हे कायमचे बहुसंख्य आणि अल्पसंख्य राहणार असल्याने आपल्या स्थितीशील समाजात संसदीय लोकशाहीच्या मार्गाने समाजपरिवर्तन कसे घडून येणार असा प्रश्न सतत त्यांच्यापुढे उभा होता. पुष्कळदा सर्वंकाष समाजक्रांतीशिवाय हा प्रश्न सुटणार नाही, असेही त्यांना जाणवत होत. पण येथील वातावरण क्रांतिकारक बदलास फारसे अनुकूल नव्हते. इतकेच नव्हे, तर क्रांतीकारी समाजवादी पक्षांनीही संसदीय राजकारणाच्या गाड्याला स्वत:ला जुंपून घेतले होते; आणि स्वत: आंबेडकरांच्या मन:पिंडाला तर संसदीय राजकारणाच मानवणारे होते. शिवाय

उदरनिर्वाहासाठी तो बहुतांशी सवर्णांवरच अवलंबून होता. अशा स्थितीत केवळ त्यांच्या एकट्याच्या बळावर येथे क्रांतिकारक शक्ती संघटित होण्याचा फारसा संभव नव्हता. म्हणून सुधारणावादी संसदीय राजकारण आणि लोकाभिमुख क्रांतिकारक राजकारण यांतील पेच त्यांना अखेरपर्यंत सोडवता आला नाही.

''आंबेडकरांच्या निधनानंतर बौद्ध समाजात त्यांच्या तोलाचा मोठा कर्तबगार नेता राहिला नाही, पण त्यांच्या कर्तृत्त्वामुळे या समाजाला सुशिक्षित वर्गात सत्तेचे राजकारण सुरू झाले. मतभेद, दुही आणि गटांचे संघर्ष यांमुळे रिपब्लिकन पक्ष थोड्याच काळात विस्कळीत झाला. सत्ताधारी पक्षाने या गटबाजीला अप्रत्यक्ष प्रोत्साहनच दिले. अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या चौकटीत विकासाचा फायदा बहुतांशी जागृत, संघटित व पुढारलेल्या वर्गालाच मिळतो. उच्चवर्णीय आणि बहुजनसमाज यांच्याप्रमाणे दलित समाजामध्येही असा महत्त्वाकांक्षी प्रतिष्ठित वर्ग निर्माण होत आहे व वैयक्तिक उत्कर्षासाठी त्याची धडपड चालू आहे. त्यामुळे काही थोड्या लोकांचा भाग्योदय झाला असला तरी बहुसंख्य दलित समाजाला मात्र अजूनही दारिद्र्य, उपासमार, आणि अत्याचार यांना तोंड द्यावे लागत आहे.''

## 'दलित पँथर' चा उदय

या उद्वेगजनक परिस्थितीतूनच दलित पँथरचा उदय झालेला आहे. हे सांगून प्रा. सरदार म्हणाले, ''केवळ निवडणुकांच्या राजकारणाने दलितांचे प्रश्न सुटणार नाही, असे पँथरच्या तरूणांना मनोमन वाटते. आजपर्यंतच्या कटू अनुभवांमुळे निवडणुकीच्या मार्गावरचा त्यांचा विश्वास उडालेला आहे. मूलगामी परिवर्तनाशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांची खात्री पटली आहे. या तरूणांमध्ये धडाडी आहे, निर्भयपणा आहे, स्पष्टवक्तेपणा आहे. त्यामुळे त्यांनी सुरूवातीलाच आपल्याकडे सवर्णांचे व अस्पृश्य समाजाचे लक्ष वेधून घेतले आहे. देशातील पुरोगामी विचारांचे लोक एक नवी उदयोन्मुख लढाऊ शक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहात आहेत. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याची भूमिकाही निःसंशय, व्यापक व सर्वस्पर्शी आहे. त्याच्या आधारे खेड्यांतील दलित व शोषित समाजात नव्या जाणिवा निर्माण करण्याचे मोठे बिकट कार्य त्यांच्यापुढे आहे. त्यांच्या भाषणांतून नेहमी सवर्णांवर ठराविक पद्धतीची अतिशय कडक टीका होते. पण तेवढ्याने काही विशेष कार्यभाग साधेल असे नाही. यापुढे संघटनात्मक कार्याकडे अधिक लक्ष देण्याची खरोखर गरज आहे. आपल्या भूमिकेला त्यांनी इतर दलितांचा पाठिंबा मिळविला पाहिजे. तसेच सवर्णांतील शोषितांचे, पुढारलेल्या समाजातील पुरोगामी प्रवृत्तीच्या निःस्पृह कार्यकर्त्यांचेही सहकार्य त्यांनी वेळोवेळी घेतले पाहिजे.'' असे सांगून प्रा. सरदार शेवटी म्हणाले, ''दलित पँथरचे नेते यापुढे किती शास्त्रशुद्ध, क्रांतिकारक पण वास्तवलक्षी व परिणामकारक भूमिका घेतात आणि त्या दिशेने खंबीरपणे व समयज्ञतेने कशी अचूक पावले टाकतात यावर केवळ दलित समाजाचेच नव्हे, तर भारतातील सामाजिक क्रांतीचेही भवितव्य अवलंबून आहे.''

('सकाळ' दैनिकातील मुलाखती, १९७४)

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# प्रा. सरदारांची मुलाखत

## डॉ. हे. वि. इनामदार

( अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे चोपन्नावे अधिवेशन सोलापूर जिल्हयातील बार्शी येथे फेब्रुवारी १९८० मध्ये भरले होते. प्रा. गं. बा. सरदार हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्या निमित्ताने जानेवारी १९८० मध्ये पुण्यास प्रा. सरदारांच्या निवासस्थानी मी त्यांची घेतलेली ही मुलाखत. )

१९८० च्या जानेवारी साहित्याची एकोणीस तारीख. शनिवारची सकाळ. प्रा. अण्णासाहेब सरदारांच्या घरी मी गेलो होतो. साहित्य संमेलनाच्या त्यांच्या अध्यक्षीय भाषणाची टंकलिखित प्रत आम्ही दोघांनी तपासून हातावेगळी केली होती.

पुण्यातल्या ठाकरसी महिला महाविद्यालयात १९५४ ते १९६८ अशी चौदा वर्षे अण्णासाहेबांच्या मार्ग-दर्शनाखाली मी मराठीचं अध्यापन केलेलं. त्यांच्या भाषणाची संहिता वाचून मी एका झपाटलेल्या मन:स्थितीत होतो. नेहमीप्रमाणेच सरदारांचे हे देखील लेखन अल्पाक्षर पण अर्थबहुल झालं होतं, पण ही पसंती सरदारांना सांगायची कशी ? आम्हा दोघामधील हार्द उपचारांच्या पलीकडचं होतं. तरीही विचारसंपन्नतेची ही वैभवशाली वाटचाल सरदारांनी केली, ती कशी, याविषयीचं एक विलक्षण कुतूहल माझ्या मनात जागं झालं होतं. ओघाओघानं मी काही विचारू लागलो. तितक्याच सहजपणानं सरदार सांगू लागले; बोलू लागले. बघता बघता आमच्या गप्पागोष्टींना एका मंत्रमुग्ध मुलाखतीचं स्वरूप आलं. ती अनौपचरिक मुलाखतच इथं सादर केली आहे

**इनामदार :** आण्णासाहेब, आपलं आडनाव सरदार. मी आहे इनामदार. आपल्या दोघांच्याही नावात सरंजामशाही आहे; पण ती खरोखरच ''नाममात्र''आहे. 'एक समाजमनस्क विचारवंत' अशीच आपली उज्ज्वल प्रतिमा आहे. सरदारकीकडून सामाजिकतेपर्यंतचा हा प्रवास आपण कसा काय केलात ?

**सरदार :** ते सांगण्यासाठी थोडं मागं जावं लागेल. जव्हारला माझा जन्म झाला. २ ऑक्टोबर १९०८ ही माझी जन्मतारीख. जव्हार ठाणे जिल्हयात आहे. आता विलीन झालेलं ते एक छोटं संस्थान होतं. जव्हारच्या परिसरातला निसर्ग सुंदर आणि संपन्न; पण तिथला माणूस मात्र दुबळा आणि दरिद्री. वारली अन् ठाकर जमातींतल्या आदिवासींचा तो मुलुख. कमरेला लंगोटी लावून हिंडणारे आणि भाताची पेज खाऊन आयुष्य कंठणारे आदिवासी बांधव पाहून माझं मन कळवळे. त्या पिचलेल्या मनांशी संवाद साधण्याचा प्रयत्न मी बालपणापासून करू लागलो.

**इनामदार :** आपले वडील जव्हारला काय करीत असत ?

**सरदार :** माझे बाबा व्यापार-उदीम करीत; थोडी सावकारीसुध्दा. त्यांना मदत करण्यासाठी लहानपणी मी हातात तराजू घेतला होता, अशी माझ्या आईची आठवण आहे. माझं मन मात्र त्यात रमलं नाही. बाबा साहसी नि शिस्तप्रिय होते. आपला व्यवहार त्यानी सचोटीनं केला 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी,' या वचनाचा वस्तुपाठ त्यांच्या वर्तनात

होता. जव्हारला आदिवासी वसतिगृह बांधायची कल्पना बाबांची. त्यासाठी त्या काळात त्यांनी पंधरा हजार रूपयांची देणगी दिली. बाबा सगळ्या जातींच्या बांधवांना स्वत:च्या घरी जेवायला बोलावीत. त्यांना पंक्तीला बसवत. त्यांच्या समत्ववृत्तीचा ठसा माझ्या मनावर उमटला.

**इनामदार :** आपलं शिक्षण कुठं झालं ?

**सरदार :** प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण जव्हारलाच झालं. उच्च शिक्षण पुण्यात. चौतीस साली सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून मी एम्. ए. झालो.

**इनामदार :** राष्ट्रीय चळवळीत कुठं काही सहभाग ?

**सरदार :** गांधीजींच्या विचारांचा माझ्या मनावर विशेष प्रभाव होता. पंचा आणि कुडता हा माझा विद्यार्थीदशेतला पोशाख होता. तीस सालच्या मिठाच्या सत्याग्रहात मी सामील झालो. 'रणशिंग फुंकिके कुणी ?' ही माझी कविता त्यावेळी 'केसरी'त आली होती. माझी ही देशभक्ती नि क्रियाशील राजकारण आईवडिलांना मानवेना. त्यांना धक्काच बसला. घरचा संघर्ष वाढला. माझ्यापुढं पेच पडला. 'सामाजिक बांधिलकी की घरची जबाबदारी ?' शेवटी मी विवेक केला. तटस्थपणानं स्वत:चाच शोध घेतला. आपलं व्यक्तित्व कृतिशीलतेपेक्षा चिंतनशीलतेकडं अधिक झुकणारं आहे, हे मला उमगलं. म्हणूनच पुढं धकाधकीच्या प्रत्यक्ष राजकारणाऐवजी वैचारिक जागृतीतून समाजप्रबोधनाच्या कामाकडं मी वळलो.

**इनामदार :** पुण्यात एस. एन. डी. टी. कॉलेजमध्ये आपण नोकरी केली. महर्षी कर्वे यांच्या शिक्षणसंस्थेकडे आपण कसे काय वळलात ?

**सरदार :** चौतीस साली मी एम्.ए. झालो. पुढं पाच-सात वर्ष मी मोकळाच होतो. तो काळ नोकऱ्यांच्या टंचाईचा होता. शिवाय आपणहून चार ठिकाणी अर्ज करावेत, कुणाजवळ शब्द टाकावा, नोकरीसाठी मिनतवारी करावी, हे माझ्या स्वभावात नव्हतं. सुदैवानं घरची स्थितीही बरी होती. बाबांचा व्यवसाय व्यवस्थित चालू होता. माझ्यावर तसं कुणी अवलंबून नव्हतं. त्यामुळं चाळीसपर्यंत मी भरपूर वाचन केलं. मराठी संत, म. गांधी आणि कार्ल मार्क्स यांचे ग्रंथ मी वाचून काढले. पुढच्यावर्षी वामन मल्हार जोशी यांनी मला एस्. एन्.डी. टी. मध्ये आपला सहकारी म्हणून बोलावलं. एक्केचाळीपासून अड्डुसष्टपर्यंत, म्हणजे पुरी अठ्ठावीस वर्षे मी पुण्याच्या एस.एन्.डी.टी. कॉलेजमध्ये मराठीचं अध्यापन केलं. विद्यापीठाच्या मराठी विभागाचा प्रमुख म्हणून अड्डुसष्टमध्ये मी निवृत्त झालो. ह्या कालावधीत चौपन्न ते अड्डुसष्ट ही चौदा वर्षे तुम्ही माझे सहकारी होताच.

**इनामदार :** नोकरीच्या आरंभकाळातल्या काही आठवणी ?

**सरदार :** इथं मी लागलो, तेव्हा वामन मल्हारांकडे प्राचार्यपद होतं. आरंभी तीन महिन्यांसाठी मी संस्थेत आलो. पुढं कायम झालो. 'जी.ए.' म्हणजे 'गृहीतागमा' या तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचे तीन वर्ग आणि एकूण साऱ्या साठ विद्यार्थिनी होत्या. प्राध्यापक दहा होते. कौटुंबिक जिव्हाळ्याचं वातावरण होते. महिलांच्या विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवणारे महर्षी कर्वे हे त्यातले अग्रगण्य. वयाच्या नव्वदाव्या वर्षी त्यांनी 'जातिनिर्मूलन संस्था' काढली. 'मानवी समता' हे नियतकालिक सुरू केलं. तत्त्वचिंतक म्हणून मान्यता पावलेले वामन मल्हार जोशी हे दुसरे. त्यांचं सौजन्य व सौहार्द असाधारण होतं, जीवनदृष्टी निकोप होती, तत्वजिज्ञासा केवळ अपूर्व होती. तिसरे प्रा.रा.कृ. लागू अध्यापनातील व्रतभावना आणि साक्षेप हे त्यांचे गुणविशेष माझ्या मनावर खोल संस्कार करून गेले, याशिवाय डॉ. कमलाबाई

देशपांडे, डॉ.वा.दा. गोखले, चित्रकार स. कृ. पिंपळखरे प्रभृती माझे सहकारी आपापल्या क्षेत्रांत प्रथितयश होते. त्या सर्वांशी माझे सलोख्याचे संबंध होते.

**इनामदार :** विद्यार्थिनींविषयीचे आपले अनुभव कसे आहेत ?

**सरदार :** पद्मा गोळे, संजीवनी मराठे, अलका इनामदार, वंदना अकोलकर, सेवा चौहान, मंदाकिनी खांडगे, मालती दांते, कुंता जगदाळे, अशा फार थोड्या विद्यार्थिनी पुढं साहित्यक्षेत्रात किंवा कला जगतात चमकल्या. परीक्षेत उत्तम यश मिळविणाऱ्या अनेक गुणी विद्यार्थिनी लग्न झाल्यावर केवळ कुटुंबाकरिता खर्ची पडतात. स्वतःच्या विकासासाठी किंवा समाजाच्या हितासाठी त्या आजही फार काही करू शकत नाहीत. पण हा दोष त्यांचा नाही. आपल्या कुटुंबसंस्थेची आणि समाजरचनेचीच ती मर्यादा आहे. स्त्री ही कुटुंबाचा आधारस्तंभ असल्यानं घरची जबाबदारी तिला टाळता येत नाही, हे खरं आहे. तरीपण स्त्री ही समाजाचाही एक घटक असल्याचं भान पुरेसं ठेवलं जात नाही.

**इनामदार :** आपला हा मुद्दा अगदी बरोबर आहे. स्त्रीची कुचंबणा फार होते, हे मान्य करायला हवं.

**सरदार :** हो ना ; स्त्री कोणत्याही कामात पडली, तर ते काम निष्ठेनं आणि नेकीनं करते. नोकरी करणारी स्त्री किंवा सार्वजनिक काम करणारी स्त्री स्वतःची शक्ती त्यात वेचते; पण बाहेर कितीही श्रम करावे लागले, तरी घरकामाकडं तिला दुर्लक्ष करता येत नाही. त्यामुळे तिच्यावर दुहेरी ताण पडतो. अखेर स्वतःची शक्ती संपली की, सार्वजनिक जीवनातून बाहेर पडून कुटुंबजीवनातच तिला रखडत पडावं लागतं.

**इनामदार :** अलीकडं ही स्थिति बदलत आहे, असं आपल्याला वाटतं का ?

**सरदार :** स्त्रीच्या दृष्टीने दिवसेंदिवस अनुकूल काळ येत चालला आहे. तरीपण अजून काही पिढ्यांत स्त्रीची मानसिक कुचंबणा चालू राहणारच असं वाटतं. त्यानंतरच्या पिढ्यांतली स्त्री खऱ्या अर्थानं स्वतंत्र होईल. अनेक क्षेत्रातून आपल्या बुद्धिमत्तेचा आणि कर्तृत्वाचा ठसा ती निश्चितच उमटवू शकेल.

**इनामदार :** स्त्रियांप्रमाणंच दलितांच्या दुःखाबद्दल आपण लिहिता आणि बोलता. आजवर अनेक चळवळी झाल्या; पण प्रा. बापूसाहेब माटे यांनी सांगितलेलं 'जातीच्या हरळीचं मूळ' काही निपटून टाकता आलं नाही; अस्पृश्यतेचा कलंक धुतला गेला नाही. आपण याची कारणमीमांसा कशी करता ?

**सरदार :** अस्पृश्यता चिवटपणानं टिकून राहिली आहे, हे तर खरंच आहे; पण त्याचं कारण केवळ दलितांचं अज्ञान किंवा दैन्य नाही. हे दोन्ही घटक तसे महत्वाचे आहेतच; पण त्याशिवाय या 'हरळीच्या मुळा' चं मूळ कारण वेगळंच आहे; आणि तेच अधिक बळकट आहे. आपल्या धर्मविचारात पापयोनित्वाची कल्पना आहे; स्पर्शजन्य विटाळाची कल्पना आहे या कल्पनेत अस्पृश्यतेचं खरं मूळ आहे, दलितांच्या केवळ स्पर्शामुळं अन्नपाणी अपवित्र बनतं ; आणि निषिद्ध ठरतं. दलिताची नुसती सावली पडली, तरी सवर्णांची शुद्धता बिघडते, हे सारंच फार, फार भयंकर आहे. माणसानं माणसाच्या अंगी नसता अमंगळपणा चिकटवण्याची ही मनोवृत्ती अभद्र आणि हीन आहे.

**इनामदार :** सवर्ण लोक दलितांना तुच्छ लेखतात हे खरं आहे. सवर्णांच्या क्षुद्र अहंकाराची ती निशाणी आहे; पण दलितच स्वतःला कमी लेखतात, त्याचं काय ?

**सरदार :** अहो, तुम्ही-आम्हीच दलितांच्या रोमरोमांत ही मानसिक गुलामगिरी भिनवून टाकली आहे. आपली जात हीन आहे, आणि आपली

पायरी खालची आहे, हे ते लोक गृहीत धरत होते. स्वत:चं जीवन निकृष्ट आहे, हा तर त्यांचा साक्षात अनुभवच होता. त्यामुळे माणूसपणाची किळस यावी एवढी लाचारी या समाजाच्या अंगवळणी पडली होती. संत चोखोबांना सामाजिक विषमतेचं शल्य बोचत होतं. त्यांचे पूर्वसंस्कार प्रबळ होते. "बहु भुकेला झालों। तुमच्या उष्टयासाठी आलों॥" असे दीनवाणे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघाले. त्यानंतर सहा शतकं लोटली; पण आजही 'जरी त्यावरी सावली माझी गेली तरी काय बाधा असे ठेवलेली ?' हा 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' अनुत्तरितच राहिला आहे, असं केशवसुतांनाही जाणवलं.

**इनामदार :** दलितांचं दुःख दूर करण्यासाठी इथं जे प्रयत्न झाले, त्याबद्दल आपलं मत काय आहे ?

**सरदार :** लोकहितवादी, न्या. रानडे आणि आगरकर यांनी अस्पृश्यतेचा रूढीला विरोध केला. पण या प्रश्नाची निकड सुधारकांना तीव्रतेनं भासली होती, असं वाटत नाही. म. फुले, शाहू महाराज आणि महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यता दूर करण्यासाठी नेटाने प्रयत्न केले; पण त्यांचे प्रयत्न प्राथमिक स्वरूपाचे होते. पुढं गांधीजींच्या प्रेरणेनं काही कार्यकर्त्यांनी या प्रश्नात लक्ष घातलं. पण त्यांची भूमिका दलितोद्धाराची होती. उद्धाराच्या कल्पनेमुळे दलितांमधला न्यूनगंड नष्ट होऊ शकला नाही. दलित समाजात स्वत्वभावनेचा चैतन्यदायी पीळ निर्माण झाला, तो डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनामुळं. याचनेची वृत्ती त्यांनी नष्ट केली; आणि आपल्या बांधवांना नैसर्गिक हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा दिली.

**इनामदार :** दलित साहित्याबद्दल आपल्याला काय वाटतं ?

**सरदार :** कालचं दलित साहित्य अस्पृश्यांबद्दल सवर्णांची सहानुभूती दाखवणारं होतं. आजचं दलित साहित्य दलितांच्याच प्रत्यक्ष अनुभूतीतून स्फुरलेलं आहे. यात दुबळेपणाला थारा नाही. त्याची भाषा विद्रोहाची आणि आव्हानाची आहे. त्यातला आत्मविश्वास दुर्दम्य आहे. 'जळलेले आयुष्य मला पुन्हा निखाऱ्यासारखे फुलवायचे आहे, 'म्हणून प्रकाशमय जीवनाकडं प्रवास करण्याचा त्या साहित्याचा निर्धार आहे. मात्र आपल्या निर्मितीतील क्रांतिकारकता टिकवून धरण्यासाठी दलित साहित्याच्या लेखकांनी विद्याव्यासंग आणि विचारसाधना यांची कास धरली पाहिजे, असं माझं त्यांना सांगणं आहे.

**इनामदार :** आपलं हे मत सर्वस्वी मान्य करण्याजोगं आहे, एवढेच नव्हे तर त्या दिशेनेच दलित साहित्याचा विकास होणं शक्य आहे. आता मी आपल्या साहित्याविषयी थोडं विचारतो. त्याची वर्गवारी करायची झाली, तर स्थूल मानानं संतविचार आणि समाजविचार या दोन वर्गात आपलं समग्र वाङ्मय सामावतं असं मला वाटतं.

**सरदार :** तुमचं हे वर्गीकरण पटण्याजोगं आहे. पण त्यामागचं तुमच्या दृष्टीनं कारण कोणतं ?

**इनामदार :** याचं कारण उघड आहे. संत आणि समाज ही आपल्या प्रज्ञेची दोन विश्रांतिस्थानं आहेत. त्या दोन वर्गात पुन्हा स्वतंत्र ग्रंथ आणि संपादित ग्रंथ असे उपप्रकारही करता येतील.

'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', 'संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी', तसेच 'ज्ञानेश्वरांची जीवन निष्ठा' ही आपली संत साहित्यपर तीन स्वतंत्र पुस्तकं. 'तुकारामदर्शन', 'रामदास-दर्शन' आणि 'एकनाथ-दर्शन' ही याच वर्गातील संपादित पुस्तकं.

**सरदार :** आणि सामाजिक गटात तुम्ही कोणती पुस्तकं घालणार ?

**इनामदार :** इथंही 'महाराष्ट्र-जीवन: खंड

१ व २' आणि 'संक्रमणकाळाचं आव्हान' ही संपादित ग्रंथसंपत्ती, 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी', 'रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा,' 'आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार,' 'प्रबोधनातील पाऊलखुणा' आणि 'नव्या-युगाची स्पंदनं' हे सामाजिक गटातले स्वतंत्र ग्रंथ येतात.

**सरदार :** तुमचं हे वर्गीकरण स्थूलमानानं बरोबर असलं तरी 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' या पुस्तकाला तयात कुठंच जागा नाही.


**इनामदार :** हो, असं होतंय खरं. त्याशिवाय आपले सुमारे पन्नास स्फुट लेख आहेत. पुस्तकांच्या प्रस्तावना, भाषण-लेख, समीक्षा-लेख, शोध-निबंध असं यांचं संकीर्ण स्वरूप आहे. दोन मोठ्या ग्रंथांचा तो ऐवज आहे. याच संदर्भात एक शेवटचा प्रश्न: आपल्या संतविचारातही समाजोन्मुखता आहे. किंबहुना, समाजचिंतन हेच आपल्या समग्र साहित्याच सार तत्व आहे. तर मग आजच्या अभ्यासकांना आपला संदेश कोणता ?

**सरदार :** संदेश वगैरे काही नाही. पण साहित्य ही व्यक्तीची निर्मिती असली, तरी अखेर तिची सामाजिक फलश्रुती कोणती, यावरच, त्या साहित्याची थोरवी अवलंबून असते, अशी माझी धारणा आहे.

**इनामदार :** आपल्या या वाङ्मयीन निष्ठेला सोन्याचा कस आहे. आपला हा लाख मोलाचा विचार घेऊनच मी आता निघतो. पुन्हा येईन !

**सरदार :** जरूर या. बराय !

पत्ता :
भारती निवास कॉलनी
६० / १५ एरंडवणे, पुणे - ४११००४



प्रा. सरदारांचे पारंपरिक स्वागत करताना आदिवासी लोक व सरदारांबरोबर वृक्षमित्र कै. त्रि. म. गोगटे

# प्रबोधनाची मशाल निमाली !

## डॉ. भालचंद्र फडके

"जोपर्यंत दलित-शोषित दु:ख भोगीत आहेत, आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रू भरून येत आहेत, तोपर्यंत आपल्याला काम करावेच लागेल" अण्णासाहेब सरदार बोलत होते. ही अगदी परवाच्या गुरूवारची गोष्ट. माझे विद्यार्थी-मित्र प्रा. गजमल माळी सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनाचे निमंत्रण प्रा. सरदार यांना देण्यासाठी आले होते. आम्ही घरी गेलो तेव्हा ते अंथरूणावर पडूनच होते. कावीळ झाल्यामुळे त्यांना बरं नव्हतं. त्यांना खूप बोलायचं होतं, पण ते शक्य नव्हतं. ते म्हणत होते, "डॉक्टरांनी एक महिनाभर बेडरेस्ट सांगितली आहे." मी म्हटलं, 'आता डॉक्टरांचं ऐकलचं पाहिजे,' पण तरीही चहा पिता पिता पाच मिनिटं चर्चा झालीच. त्यांचे म्हणणे होते की समाजात उदयास आलेल्या नव्या बंडखोर शक्तींना शब्दरूप मिळाले नाही. त्यांच्या आंदोलनामागे वैचारिक अधिष्ठान उभे राहिले नाही, हे खरे आहे. कणखर, तात्त्विक पाया न मिळाल्याने चळवळीचे अमाप नुकसान झाले. त्यांच्यातील शक्ति वाहून गेली किंवा क्षीण व नि:सत्त्व होत गेली. याचे कारण या काळात उच्च वर्ग लोकजीवनातील या घडामोडींबाबत उदासीन राहिला आहे हे आहे. सांस्कृतिक परंपरा असलेल्या, विद्येच्या बाबतीत आघाडीवर असलेल्या या बुध्दिमंतांच्या वर्गाने भोवतालच्या जागृतीची दखल घेतली नाही. ही खरी शोकान्तिका आहे. त्यामुळे जाग्या होणाऱ्या वर्गांच्या जाणीवा प्रासंगिक लढ्यापुरत्या जागरूक व प्रचारकी राहिल्या. त्यांना शिस्तशीर शास्त्रीयता व व्यापक भान येऊ शकले नाही.

गुरूवर्य आण्णासाहेबांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे ते आपली भूमिका ठामपणे मांडत. ते कुणाचेही भय बाळगत नसत. भयग्रस्त समाजात स्वतंत्र विचार वाढत नाही. अण्णासाहेब तसे संयमाने बोलणारे, पण प्रसंगच पडला तर त्यांची वाणी प्रखर होते आणि आसूडहि ओढू शकते. अकोल्याचे साहित्य संमेलन मला चांगलं आठवतं. मंडप खच्चून भरलेला, वसंतराव साठ्यांचं नाटकी ढंगातलं भाषण संपलं. तसा त्यांच्या भाषणात नेहमीच विचारांचा खुजेपणा असतो. अध्यक्षपदाची सूत्रे गो. नि. दांडेकरांच्या हाती देण्यासाठी प्रा. सरदार उभे राहिले. पाच मिनिटेच त्यांनी बोलावे अशी अष्टीकरांची सूचना आम्हाला योग्य वाटली नाही. त्या पाचच मिनिटांत सरदार जे बोलले त्या प्रत्येक शब्दाला श्रोते मन:पूर्वक दाद देत होते. ते म्हणाले, 'बुवाबाजी कोणत्याहि क्षेत्रातली असो, त्याज्यच. धार्मिक क्षेत्रातली बुवाबाजीपेक्षा राजकारणातील बुवाबाजी लोकशाहीला घातक ठरते.' त्याबरोबर सारे सभागृह टाळ्यांच्या कडकडाटात पार बुडून गेले. नेहमी तोलून मापुन पण ठामपणे बोलणाऱ्या सरदारांच्या वाणीला विलक्षण तेज चढले होते. तिच्या अंगी दाहकता होती. कधी कधी असे घडते की, एखाद्याचे शब्द मंत्रशक्तीने जणू भारलेले असतात. त्या दिवशी प्रा. सरदारांच्या ऋषितुल्य वाणीचे सामर्थ्य नव्याने जाणवले.

आमच्या फडके परिवाराचे आणि त्यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे. माझे नाशिकचे काका डॉ. सुधीर फडके हे त्यांचे जव्हारचे

बालमित्र. ते, आमचे काका आणि गोदुताई परूळेकर यांच्या रंगलेल्या मैफली आणि त्यावरील काकांचे भाष्य मी ऐकत असे. दलित-शोषितांवरील अन्याय, त्यांचे प्रश्न हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय. अण्णासाहेबांनी एकदा म्हटले होते, 'दलित आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्वावर चळवळ संघटित होत असेल, तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.'' आपली संपूर्ण हयात अण्णासाहेबांनी वेचली म्हणून ''प्रबोधनाचे भाष्यकार'' अशा शब्दांत त्यांचा महाराष्ट्राने गौरव केला. ज्ञानोपासना हा केवळ बौध्दिक व्यापार नसून, समग्र मानवी जीवन उजळून टाकणारी ती एक दुर्दम्य प्रेरणा आहे, असे ते म्हणत. पण जे ज्ञान आपण मिळवले ते समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवले पाहिजे. या तळमळीने त्यांनी व्याख्याने दिली. चर्चात भाग घेतला. जुने व नवे विचार पारखून नवसमाजाची आव्हाने स्वीकारण्यासाठी लोकांची मने तयार करण्यासाठी त्यांनी आयुष्याचा क्षण न् क्षण वेचला. प्रबोधन हे परिवर्तनाच्या लढ्यातील अमोघ शस्त्र आहे. प्रबोधनामुळे मूक क्रांतीचा आरंभ होतो आणि हळूहळू क्रांतीसाठी जनमानस सिध्द होऊ लागते. अण्णांना या देशात अपेक्षित होती ती सांस्कृतिक क्रांति. एकीकडे प्रस्थापित समाजव्यवस्था आणि तिचे अपत्य शासन आणि दुसरीकडे प्रस्थापितांना आणि शासनाला गुलाम करणारी भांडवलशाही आणि या सर्वांच्या दबावाखाली असलेला दारिद्र्य-रेषेखाली जगणारा दलित-शोषितवर्ग अशा परिस्थितीत क्रांति होऊ शकेल काय? अण्णासाहेब कधीच निराशावादी नव्हते, ते आशावादी होते. आज जरी परिस्थिति विरूध्द असली तरी आणि सांस्कृतिक क्रांतीचे प्रर्वतन होणे कठीण असले तरी त्यांचे म्हणणे होते की, सांस्कृतिक क्रांति घडू शकेल. ते म्हणाले, ''चाकोरीपासून सुटण्याची, बेतून दिलेल्या जीवनदृष्टीच्या पलीकडे जाण्याची क्षमता मनुष्यमात्रात आहे, म्हणूनच इतिहासात मनुष्यजातीची प्रगती होत आलेली आहे. अशी क्रांतिकारक माणसे अल्पसंख्य असतात, तरी बाह्य वातावरणाच्या अनुकूलतेने त्यांची संख्या वाढू शकेल. कारण प्रत्येकातच ही सीमोल्लंघनाची व नवनिर्माणाची क्षमता असते. असे वातावरण निर्माण करणे व क्रांतिकारक प्रवाह वाढविणे हे या मूठभर दृष्टच्या व ध्येयवादी माणसांचे काम असते. कोणत्याही चळवळीत नेतृत्व महत्त्वाचे असते, पण सबंध चळवळ निरलस, त्यागी, निष्ठावान कार्यकर्त्यांनी आणि विचारवंतांनी बलवान केलेली असते. पण नेते नेमके हे विसरतात. ते आपल्याच कार्यकर्त्यांचे व तत्त्वज्ञान बांधणाऱ्या विचारवंतांचे शोषण करू लागले व चळवळ हे आपल्या स्वार्थाचे साधन मानू लागले, तर त्या चळवळी कोसळायला वेळ लागत नाही. म. गांधींच्या नेतृत्वाखाली चळवळ गतिमान झाली आणि म. गांधीजीनंतर स्वातंत्र्याच्या कालखंडात गांधींवर म्हणजे गांधींच्या नांवावर जगणारे पुष्कळ नेते फेकले गेले. परिणामी गांधीजींची चळवळ मानवी स्वातंत्र्यासाठी होती याचा विसर पडला. त्याऐवजी सत्तासंपादनासाठी चळवळी सुरू झाल्या आणि काँग्रेसपासून जवळजवळ सर्व पक्ष फुटले व त्यांची शकले झाली. सर्व पक्ष व्यक्तिनिष्ठ झाले आणि चळवळीही व्यक्तिनिष्ठ झाल्या. हा आपणा सर्वांचा अनुभव आहे. सांस्कृतिक क्रांतीच्या प्रवर्तकांनी कोणती पथ्ये पाळावीत या प्रश्नाचे उत्तर देताना सरदार म्हणतात, ''पहिली गोष्ट वर्ग-जात-प्रदेश-काळ यांच्या कुंपणातून बाहेर पडून सत्यशोधक, स्वतंत्र बुध्दिची त्यांनी कसोशीने जोपासना केली पाहिजे. त्याचप्रमाणे आजच्या

समाजातील 'यशा' ची व्याख्या, प्रतिष्ठेच्या कल्पना, यांपासूनहि तो मुक्त असायला हवा. तरच आपले विचारस्वातंत्र्य व ध्येयनिष्ठा तो सांभाळू शकेल. सततचे कठोर परीक्षण-आत्मपरीक्षण वैचारिक क्षेत्रात अत्यंत आवश्यक आहे.'' असे म्हणणाऱ्या अण्णासाहेबांचे बोलणे 'हे तो प्रचीतीचे बोलणे' होते म्हणून त्याला महत्त्व आहे. ही भूमिका स्वीकारल्यामुळे ज्ञानेश्वर, म. गांधीजी, मार्क्स, फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारसृष्टीवर ते स्वतंत्र बुध्दीने चिंतन करू शकले. ते व्यक्तिवादी कधीच नव्हते. ते विचारांचाच मागोवा घेत राहिले.

माझ्या 'डॉ. आंबेडकर चरित्र' या पुस्तकाचे प्रकाशन करताना त्यांनी एक वेगळीच भूमिका मांडली. 'गांधी-आंबेडकर संघर्ष' या एका प्रकरणाची मीमांसा करीत असता ते म्हणाले, 'या दोन महापुरूषांचे विचार व कार्य या देशाच्या अभ्युदयासाठी एकमेकाला पूरक होते. डॉ.आंबेडकर घटनासमितीत म्हणाले की, 'व्यक्तीने आपले स्वातंत्र्य कोणत्याहि व्यक्तीच्या चरणी अर्पू नये.' प्रा. सरदारांना लोकशाही राजव्यवस्थेत व्यक्तीचे-तिला लाभलेल्या व्यक्ति, विचारस्वांतत्र्याचे मोल अधिक वाटे.' 'एक व्यक्ति, एक मुल्य' हे तत्त्व म्हणजे लोकशाहीचे प्राणतत्त्व. पण आज लोकशाही म्हणजे 'एक व्यक्ति, एक मत.' असा मर्यादित अर्थ राज्यकर्त्यांनी केला आहे. म्हणून मतासाठी मानवी मूल्यांचाहि बळी दिला जातो. त्यामुळे लोकमान्य टिळक म्हणत त्याप्रमाणे ''आमच्या देशातील लोकमत म्हणजे वाऱ्याची मोट आहे. तृणाचे दोरखंड नव्हे; आणि यात जर काही सुधारणा झाली नाही, तर त्याचा दोष लोकांपेक्षा पुढाऱ्यांकडे अधिक आहे, असे आम्ही समजतो.'' पण लोकमान्य टिळकांची भूमिका आजचे नेते घेतील काय? ते सर्व अपयशाचे खापर जनतेच्या माथी मारतील म्हणून प्रा. सरदार म्हणतात, 'सामान्य माणसाच्या निर्णयशक्तीवरील विश्वास हेच लोकशाहीचे खरे अधिष्ठान आहे. याचा अर्थ लोकमताचा कौल कधी चुकणार नाही, असे नाही. पण चुकतमाकत, अडखळत, ठेचाळत लोकांना आपल्या प्रगतीचा मार्ग शोधू द्या. मनुष्यमात्र स्खलनशील आहे. लोकांच्या हातून चुका होतील, पण त्यांना वेळोवेळी पटवून देऊन त्या सुधारण्यास प्रवृत्त केले पाहिजे. मतमतांच्या गलबल्यांतून त्यांना अचूक मार्ग सापडला नाही, तर त्याची जिम्मेदारी कार्यकर्त्यांची आहे.'' कारण ''आपापल्या धोरणांचा आणि कार्यक्रमांचा प्रचार करताना वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी या प्रश्नांचे सर्वसामान्य स्वरूप आणि महत्त्व समजावून दिले व ते सोडवण्याचे वेगवेगळे पर्याय त्यांच्या पुढे ठेवले, तर आपण कोणाचे पुढारीपण पत्करावे, कोणाला आपले प्रतिनिधि म्हणून निवडावे याचा निर्णय ते बरोबर करू शकतील. प्रत्येक मनुष्याला मग तो सुशिक्षित असो वा नसो योग्य मार्गदर्शन लाभल्यास आपले हित कशात आहे ते ठरविता येते,'' म्हणून लोकशाही राज्यात लोकमत घडवण्यासाठी एखाद्या प्रश्नावर लोकमत जागृत किंवा प्रक्षुब्ध करण्यासाठी प्रबोधन हीच मुख्य शक्ति आहे.

नव्या ज्ञानाचा, नव्या विचारांचा वाटा आपल्याकडे फिरकू न देता जी ज्ञानसाधना चालते ती स्थितीशील असते. विद्वान माणसाने निवडलेले ज्ञानक्षेत्र लहान असू नये. त्याच्याजवळ माणुसकीचा ओलावा हवा. आपल्याला गवसले तेच खरे, अशा भावनेने ते ज्ञानवृध्दीच्या वाटा रोखून धरतात, एकोणिसाव्या शतकातील संगति-विसंगति शोधताना गुरूवर्य सरदारांनी शास्त्रीय दृष्टि स्वीकारली, विज्ञानाची महती पुष्कळ लोक सांगतात, पण त्यांना समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवता येत नाही, सरदार मात्र वैज्ञानिक दृष्टिकोनाला अग्रमान देतात. गांधी, मार्क्स इत्यादि

महापुरूषांचे विचार असोत, फुले, आंबेडकरांचे विचार असोत, साहित्यविषयक प्रश्न असोत, किंवा धर्म चिकित्सा करावयाची असो, सरदारांनी आपला वैज्ञानिक दृष्टिकोन कधी सोडला नाही. जे कालबाह्य झालेले आहे. ते आपण त्याज्य मानावे, पण त्यातील चिरंतन अंशहि टिकवून धरावा, ते म्हणतात, ''मी स्वत: आस्तिक नाही. पण मी ज्ञानेश्वरी वाचतो. ज्ञानेश्वरांचे जे उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे. तुकारामाच्या वाणीमध्ये रंजल्यागांजल्याविषयी जो कळवळा आहे त्याचे मला आकर्षण वाटते. मात्र १९७३ मध्ये तुकारामांचे तत्त्वज्ञान उपयोगी पडेल, असे कुणी सांगू लागले तर ते मी मानणार नाही. गांधी-नेहरूंचे तरी सर्वच्या सर्व विचार मला कुठे पटतात? त्यांच्या काळात त्यांनी मोठी कामगिरी केली पण आजचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे विचार पुरे पडणार नाहीत. माणूस कितीहि मोठा असला तरी तो अपूर्णच असणार. त्याच्या विचाराला आणि कर्तृत्वाला काळाच्या आणि परिस्थितीच्या मर्यादा पडतात हे ध्यानात घेतले पाहिजे.'' सरदारांची ही प्रश्नाकडे पाहण्याची निकोप दृष्टि त्यांच्या निर्भय विचारामागे असते. बार्शीच्या साहित्य संमेलनात त्यांनी संमेलनाच्या व्यासपीठावर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न निर्भयपणे मांडला. अगदी परवा त्यांना ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सर्वांनी शुभेच्छा दिल्या. पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत त्यांनी निर्भयपणे सांगितले की, मराठवाडा विद्यापीठाच्या नावामागे डॉ. आंबेडकरांचे नांव जोडल्यामुळे मराठवाड्याच्या अस्मितेला बाधा येणार नाही, उलट तिचा गौरवच होईल.

साहित्य हा तर त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. साहित्याचे विश्व स्वायत्त आहे, हे जरी त्यांना माहित असले तरी मराठी साहित्याच्या विकासाच्या दृष्टिने लेखकाची बांधिलकी समाजपरिवर्तनाशी असली पाहिजे. ज्ञानोपासना करणारा वर्ग आणि राबणारा वर्ग पूर्णपणे वेगळ्या असणाऱ्या समाजात साहित्याची समाजाशी बांधिलकी असल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. जे सामाजिक बांधिलकीचा पुरस्कार करतात त्यांची टवाळी अनेक वेळा अडाणी माणसे करत असतात. कारण त्यांना साहित्याचे व समाजाचे नाते अतूट असते, याची जाणीव नसते. प्रा. सरदार म्हणतात, 'व्यक्ति ही स्वतंत्र असली तरी एकाकी असत नाही. समाजाचा मुलभूत घटक म्हणून ती सर्वत्र वावरते असते. कलात्मक साहित्याची घडण ही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे रंगरूप घेऊनच होत असते, यात शंका नाही. समाजाच्या प्रवाहाबरोबर लेखकाला राहाता येणार नाही. सामाजिक ऋणानुबंधाची जाणीव जेव्हा लुप्त होते, तेव्हा साहित्याची वाढ खुंटते व ते अत्यंत संकुचित व एकांगी होते. साहित्याची बांधिलकी एका मुलभूत क्रांतिकारक जीवननिष्ठेला असते, नव्हे असायला हवी.'' हेच तर प्रा. सरदारांच्या साहित्यविचारांचे सूत्र आहे.

गुरूवर्य अण्णासाहेबांच्या सर्वच लेखनाला निखळ, सामाजिक जाणिवेचा भरभक्कम पाया आहे. तळागाळातल्या माणसासाठी त्यांचे अंत:करण काठोकाठ सहानुभूतीने भरले होते. त्यांची अखेरची यात्रा सुरू झाली तेव्हा माझ्या जवळचे एक सामाजिक कार्यकर्ते म्हणाले, 'आमचा हक्काचा वैचारिक आधार गेला,' मला पुन्हा त्यांची गुरूवारची भेट आठवली. ते थोडा वेळ जे बोलले त्यात या देशाच्या भवितव्याविषयीची चिंता होती. या अनुषंगाने रवींद्रनाथ टागोरांची गीतांजलीतील कविता आठवली. ते लिहितात,

''जेथे माणसाचे मन निर्भय आहे,
आणि जेथे विचार उदात्त आहेत,
जेथे ज्ञान मुक्त आहे,
जेथे जगाचे विभाजन संकुचित भिंतीमुळे
झालेले नाही.
त्या स्वतंत्रतेच्या स्वर्गात माझ्या देशाला
प्रकाश दिसू दे.
माझ्या देशाला जाग येऊ दे.''

असे स्वप्न बाळगत अण्णासाहेब सरदार

चिरयात्रेला निघाले आणि आमच्या जवळची प्रबोधनाची मशाल अस्त पावली.
( केसरी, रविवार, ४ डिसेंबर ८८ मधून साभार. )

पत्ता :
संचालक, शैक्षणिक विभाग,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक

---

तोषवोनी सकळांच्या मति। उजळोनी संतोषाच्या ज्योती।
पुसोनी अंधाराची पाटी। रेखू ललाटी भाग्यलेखा।

दीपावली म्हणजे मानवी समाजाच्या संपन्नतेचा तेजोमय अविष्कार. या संपन्नतेसाठीच महाराष्ट्र गेली ३० वर्षे विकासाची एक एक वात लाऊन सर्वसामान्यांच्या लक्षावेधी जीवनज्योती उजळीत आहे. दीन, दलित, आदिवासी या समाज घटकांचे जीवन उजळावे म्हणून गेल्या दोन वर्षाहून अधिक काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांच्या कुशल व गतिमान नेतृत्वाखाली निर्धारपूर्वक पाऊले टाकली आहेत.

दोन वर्षापूर्वी दिवाळीच्या मूहूर्तावरच लक्षावधी अल्प व अत्यल्प भूधारकांना रू. २०० कोटींच्या कर्जभारातून मुक्त करण्याचा शुभशकुनी निर्णय घेण्यात आला. त्यानंतर गाव हाच विकासाचा घटक मानून रोजगार हमी योजनेचा श्रमशक्तीशी घातलेला समन्वय, लक्षावधी हेक्टर पडीत जमीन लागवडीखाली आणून शेतीवरील भार हलका करण्यासाठी आखलेला फळलागवडीचा महत्वाकांक्षी कार्यक्रम, आठव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामोदयोगातून सहा लक्षे लोकांना रोजगार देण्याचा निर्धार, रोजगारात स्त्रिया व अनुसूचित जाती-जमातीतील लोकांना अग्रहक्क, ग्रामीण भागातील दैन्य दूर करण्यासाठी अविकसित भागात ६५ विकास केंद्रांची निवड व ९४ लघुऔदयोगिक केंद्रांच्या स्थापनेसाठी उचललेली पाऊले, मागास भागात उद्योग सुरू करणाऱ्या उद्योजकांना विशेष सवलती तसेच अनिवासी भारतीयांच्या संकल्पित ४७० औद्योगिक घटकांना मंजूरी, गडचिरोली. चंद्रपूर आणि धुळे जिल्हयातील आदिवासींच्या जलद विकासासाठी कालबध्द विशेष कृति कार्यक्रम, कोकण विकासासाठी कोकण रेल्वे प्रकल्पाच्या आर्थिक भाराचा मोठा वाटा उचलून त्यास गती देण्याचा संकल्प तसेच विदर्भ, मराठवाडा, कोकण यांच्याबरोबरच उर्वरित महाराष्ट्रासाठीही वैधानिक विकास मंडळ स्थापण्याचा केंद्राकडे आग्रह, आदि निर्णय महाराष्ट्राच्या सकलजनांचा भविष्यकाळ निश्चितपणे उजळतील.

**कृतिशील शासन : महाराष्ट्र शासन**

---

**शासनाचे मुखपत्र ''लोकराज्य'' नियमित वाचा : वार्षिक वर्गणी रू. २५.**

**डीजी आयपीआर.**

# प्रा. गंगाधर बाळकृष्ण सरदारः प्राध्यापकांच्या सामाजिक बांधिलकीचा आदर्श.

## देवदत्त दाभोलकर

### I

प्रा. गं. बा. सरदार यांचा आणि माझा चार दशके निकटचा परिचय होता. वैयक्तिक व वैचारिक. १९४८ ते १९५३ या कालखंडात मी पुण्यात फर्ग्युसन व बृहन्महाराष्ट्र या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करीत होतो. 'नवभारत' हे मासिक त्या सुमारास नुकतेच सुरू झाले होतो. व मीही माझ्या नव्याच उत्साहाने त्यात लेखन करीत होतो. प्रा. कि. म. बेडेकर त्यावेळी नवभारत च्या संपादक होते. दर महिन्यात ते आपल्या घरी नवभारत चे लेखकांची, काही विचारवंतांची, बैठक घेत असत, प्रा. गं. बा. सरदार, दि. के .बेडेकर, प्रा. अ. रा. कामत, प्रा. स. वा. कोगेकर नियमितपणे येत असत. अधूनमधून श्री. शंकरराव देव, आचार्य भागवत इत्यादी मंडळीही येत असत. प्राध्यापक सरदारांचा आणि माझा पहिला परिचय तेथे झाला. आणि कोणीही विशेष सायास न करता तो अुत्तरोत्तर वाढत गेला. अनेक सभा, संमेलने, परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादींच्या निमित्ताने आम्ही वरचेवर एकत्र आलो. एकत्र राहिलो. माझ्या मनात त्यांच्याविषयी आदरयुक्त स्नेहभाव होता, त्यांच्या मनात माझ्याविषयी स्नेहयुक्त अगत्य होते.

त्या चाळीस वर्षांच्या कालखंडात त्यांची बाह्य आकृती त्याच आकारमानाची व तशीच सौम्य शांत अशी राहिली. आंतरिक बैठकही त्या आधीच घडलेली होती. आपल्या विषयाचा सखोल अभ्यास करावा, त्या विषयाच्या विविध कक्षांचा मागोवा घ्यावा, सुगम संयत शैलीत त्याचे विवरण करावे, सर्वांविषयी योग्य तो आदरभाव ठेवावा, कोणाचाही अधिक्षेप करू नये, भावनेची स्नेहार्द्रता सर्वांविषयी असावी. परंतु आपली वैचारिक बुध्दिनिष्ठ, तर्कशुध्द बैठक ढळू नये अशी त्यांची ज्ञानार्जनाची व ज्ञानावितरणाची पध्दत असे. ' यद् यद् विभूतिमत् सत्त्वम्' त्याच्या त्याच्यापुढे त्यांचे अंत:करण विनम्र होत असे परंतु बुध्दि वाकत नसे. यातही हटाग्रह नव्हता. आज मला जे सत्य असे दिसते त्याचा पाठपुरावा मी करीन परंतु मला आज दिसते तेच अन्तिम सत्य आहे असा माझा दुराग्रह असणार नाही. बुध्दिला नव्या प्रकाशात नवे काही दिसले तर त्याचेही मी मोकळ्या मनाने स्वागत करीन अशा स्वरूपाची त्यांची धारणा होती. with malice towards none, with goodwill towards all, with firmness in the right as God grants us to see the right या लिंकनच्या उद्‌गाराशी ते पूर्णपणे सहमत झाले असत हे त्यांच्या विचारसरणीवरून आणि जीवनसरणीवरूनही स्पष्ट आहे. कोणाही विषयी व्देषभावना नाही, सर्वांविषयी सद्‌भाव, सत्याविषयी आग्रह '- सत्याच्या आकलनाची जी शक्ती परमेश्वराने दिली आहे त्या मर्यादेत' - या आशयाच्यावरील वचनातून कदाचित परमेश्वराला बाजूला काढून

' माझ्या बुध्दिच्या मर्यादेत ' असा शब्दप्रयोग त्यानी केला असता.

ज्ञानार्जन आणि ज्ञानवितरण या प्राध्यापकांच्या आद्य अुत्तरदायित्वाविषयी याहून अुदात्त भूमिका असू शकत नाही. तेवढीच प्रा. सरदार यांची असती तरीही ते अेक असामान्य असा आदर्श म्हणूनच ओळखले गेले असते.

परंतु या भूमिकेच्याही अधिक वरच्या स्तरापर्यंत त्यांना नेणाऱ्या अूर्मी त्यांच्या अंत:करणात वसत होत्या.

## II

संतवाङमय हा प्रा. सरदारांच्या अध्ययन अध्यापनाचा विषय. समाजजीवन हा त्यांच्या असीम आस्थेचा विषय, संतवाङमय आणि धर्म अेकमेकांशी निगडीत आहेत हे सांगावयास नको. धर्माकडे समाजजीवनाच्या दृष्टीने सामाजिक दृष्टिकोनातुन पहावे लागते हे अनेकांच्या लक्षात येत नाही व आले तरी त्यापैकी कित्येकाना ते अडचणीचे वाटते. धर्माच्या समाजजीवनाशी (सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय) संबंधित अंगांचा मूलभूत विचार मार्क्स, गांधी व आंबेडकर यानी केला. प्रत्येकाचे विश्लेषण वेगळे होते; प्रत्येकाने सुचविलेली अुपाय योजनाही वेगवेगळी होती. या तीनही विचारप्रवाहांच्या अनुषंगाने प्रा. सरदार यानी धर्मकल्पनेचा विचार केला आहे.

'समाजवाद' हा शब्द आज प्रचंड व्यावर्तात सापडला आहे. त्याच्या विवेचनात याठिकाणी जाण्याचे कारण नाही. खालील अवतरण प्रा. सरदार यांच्या 'समाजवाद, अीश्वरनिष्ठा आणि कर्मकांड' या प्रकाशनातून घेत आहे. त्यात प्रारंभीच 'समाजवाद' या संकल्पनेचे काही विशदीकरण केले आहे. ती व्याख्या, व्याख्या म्हणून व ध्येय म्हणूनही या सर्व व्यावर्तात देखील शेवटी टिकून राहण्यासारखी आहे; टिकून रहावयास हवी.

प्रा. सरदार सांगतात

''समाजवाद म्हणजे सामाजिक न्याय व समता यावर आधारललेल्या शोषणमुक्त समाजाची उभारणी हे उद्दिष्ट प्रबोधन, रचनात्मक कार्य आणि संघर्ष या त्रिविध मार्गाने साध्य करावे लागेल. समाजात जोपर्यंत शोषक आणि शोषित असे दोन मुख्य वर्ग आहेत, त्यांच्या हितसंबंधात जोपर्यंत विरोध आहे, तोपर्यंत संघर्ष हाच मूलगामी परिवर्तन चळवळीचा केंद्रबिंदू राहणार हे उघड आहे.हा संघर्ष सु-संघटित व प्रभावी व्हावा म्हणून त्याला प्रबोधन व रचनात्मक कार्य यांची जोड देणे आवश्यक ठरते. हे त्रिविध कार्य सामाजिक जीवनाच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अित्यादी सर्व आघाड्यांवर अेकसुत्रीपणाने चालू ठेवणे अगत्याचे आहे. या कार्यात जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे जाअून समाजातील सर्व शोषित घटक अेका ठाम भूमिकेवर अेकत्र आल्याखेरीज ते यशस्वी होणार नाही. त्यात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग सिद्ध होण्यासाठी आपल्या सार्वजनिक जीवनात धर्मनिरपेक्षतेचे वातावरण नांदले पाहिजे. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोध नव्हे; आणि धर्मद्रोह तर नव्हेच नव्हे.''

प्रा. सरदार पुढे सांगतात

''विज्ञानप्राप्त सुविधांचा प्रसार झपाट्याने होत आहे; पण वैज्ञानिक दृष्टीकोण मात्र कुठेच दिसून येत नाही. जनसामान्याच्याच नव्हे. तर राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांच्या व विचारवंतांच्या मनावरही पारंपारिक व विधिनिषेधात्मक धर्माचा पगडा जबरदस्त आहे. अुदिष्ट व्यापक समाजवादाचे आणि व्यवहारात प्राबल्य संकुचित धर्मभावनेचे हा आपल्या राष्ट्रीय जीवनातील अंतर्विरोध आहे. तो दूर केल्याखेरीज समाजवादाचे स्वप्न साकार होण्याची आशा बाळगणे व्यर्थ आहे.

"हा अंतर्विरोध दूर करायचा तर आपल्या सामाजिक वास्तवाची अचूक ओळख करून घेतली पाहिजे, त्याची दृढ पकड घेता आली पाहिजे. त्याची बलस्थाने आणि त्याच्या मर्यादा यांचे सम्यक् आकलन झाले तरच वास्तवात मूलगामी परिवर्तन घडवून आणणे, त्याला नवा आकार देणे शक्य होईल. नवे काही घडवावयाचे तर त्यासाठी लागणारी साधने आणि शक्ती या वास्तवातूनच मिळवावी लागतात. त्यादृष्टीने वास्तवातील कोणत्या प्रवृत्तींची जोपासना करावयाची व कोणत्या हिणकस भागाचे अुच्चाटन करावयाचे याबद्दलचे आपले निदान जेवढे निर्दोष आणि परिपूर्ण होईल तितक्या प्रमाणात समाजपरिवर्तनाच्या चळवळीने घडवून आणलेला बदल टिकावू आणि परिणामकारक होअील."

प्रा. सरदार यांच्या अभ्यासविषयाच्या कक्षा कशा विस्तारत जातात व समाजजीवनातील मूलभूत समस्याना स्पर्श करून त्यांचा मागोवा घेतात हे यावरून स्पष्ट होअील.

आदर्श प्राध्यापकाच्या पायाभूत स्तराच्या वरचा हा स्तर आहे.

## III

परंतु प्रा. सरदार अेवढेच थांबले नाहीत. या मर्यादेपर्यंत परंतु या मर्यादेच्या आत महत्त्वाचे संशोधनाचे विश्लेषणाचे कार्य करणारेही नामवंत प्राध्यापक असतात. 'Beyond the Ivory Tower' चा सर्व प्रदेश त्यानी आपल्याला 'Out of bounds' ठरवलेला असतो. त्यानी आपली लक्ष्मणरेषा काढलेली असते. या मर्यादेत होणाऱ्या खऱ्या महत्त्वाच्या संशोधनाच्या कार्याचे मोल मान्य केलेच पाहिजे. परंतु असे आपापल्या क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करीत असतानाच बाहेरच्या समाजाचेही आपण काही विशेष ऋण लागतो या भावनेने काम करणारेही नामवंत प्राध्यापक अन्य देशात व भारतातही झाले आहेत व आजही आहेत. प्रा. सरदारांचे स्थान या वर्गातील प्राध्यापकात होते.

ज्ञान आणि कृती यांचा सांधा वैचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी जसा जोडला पाहिजे तसाच तो कृतिशील असणाऱ्या कार्यकर्त्यांनीही मजबूत ठेवला पाहिजे असे त्यांचे सांगणे होते. ते सांगतात.

"या नव्या कार्यकर्त्यांनी विचार आणि कृती यांचे नाते नीट समजून घेणे अगत्याचे आहे. विचाराची व पुस्तकी ज्ञानाची अुपेक्षा करून चालणार नाही. पुस्तक म्हटले तरी ते कोणाच्या तरी अनुभवातूनच तयार होते. 'आम्ही कृतिशील आहोत, वैचारिक काथ्याकूटाची आम्हाला गरज नाही." ही भूमिका आत्मघातकीपणाची आहे. विचाराचा पाया नसलेली कोणतीही कृती परिवर्तन घडवून आणू शकणार नाही. जगात ज्या ज्या क्रान्त्या झाल्या, त्यांना प्रेरणा देणारे काही तत्त्वज्ञान तिथे निर्माण झाले होते. अनुभवातून शिकता येते. पण तो अनुभव औपपत्तिक पातळीवर नेता आला तरच. अनुभवातून अेक संगती आणि सातत्य तयार होते, तेव्हा त्याचे शास्त्र बनते. तेव्हा शास्त्र आणि अनुभव, तत्त्व आणि व्यवहार यांच्यात फारकत करून, त्यातील कोणत्याही अेका गोष्टीची अुपेक्षा करणे हे समाजप्रगतीला विघातक ठरते."
(महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल पृ. ६९-७०)

प्रा. सरदार राजकारण हे मूलतःच हीन त्याज्य असे मानाणारे नव्हते. परंतु राजकारण हा त्यांचा पिंड नव्हता. कोणत्याही राजकीय पक्षाच्या दावणीला स्वतःला बांधून घेणे त्यांच्या मनःप्रकृतीला मानवणारे नव्हते. राजकीय पक्षापासून दूर राहून, समर्पित वृत्तीने, प्रबोधन, विधायककार्य व संघर्ष या मार्गांनी छोट्या छोट्या क्षेत्रात प्रखर काम करू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गटाविषयी यामुळेच त्याना आत्मीयता वाटत

असे आणि यामुळेच या गटांचे कार्य अंतिम परिणामतः विफल होत आहे असे आढळून आले की ते व्यथित होत. ही त्यांची व्यथा मी पाहिली आहे. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल सांगताना ते लिहितात ( पृ. ६९ )

''सर्वंकष परिवर्तनासाठी काम करणाऱ्या आणखी अेका शक्तीचा अुल्लेख आवश्यक आहे. ती म्हणजे संसदबाह्य क्षेत्रातील कृतिशील संघर्षप्रवण संघटना. महाराष्ट्रात अशा ३०-४० संघटना आणि दोनशेअेक कार्यकर्ते असतील की जे निवडणुकामध्ये प्रत्यक्ष भाग घेत नाहीत. लोकांचे प्रश्न घेअुन त्यांच्या सोडवणुकीसाठी जे स्वतंत्रपणे पक्षनिरपेक्ष दृष्टीने कार्य करतात. संसदीय राजकारणात जो संधिसाधूपणा शिरला आहे आणि ज्या तत्त्वशून्य तडजोडी केल्या जातात, त्यापासून या संघटना बऱ्याच अंशी मुक्त आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाला निश्चित मोल आहे. परंतु ही शक्ती आज इतस्ततः विखुरलेली आहे त्यामुळे गरजेच्या मानाने या संघटनांचा प्रवाह नगण्य ठरतो, याचाही विचार या कार्यकर्त्यांनी करायला हवा. प्रस्थापितांवर मात करण्याअेवढी जनशक्ती संघटीत करावयाची असेल, तर आपसातील लहानसहान मतभेद विसरून परस्पर सामंजस्याने व सहकार्याने काम करण्याचा शहाणपणा त्यानी दाखविणे जरूर आहे.''

पुढे प्रा. सरदार सांगतात

''आज या चळवळीमध्ये प्रत्येक संघटनेचा सवता सुभा आहे. ही दुखस्था केवळ परिवर्तनशील व्यापक संघटनापुरतीच मर्यादीत नाही, तर परंपरागत शोषित वर्गाच्या प्रत्येक घटकाच्या ज्या वेगवेगळ्या संघटना स्थापन झाल्या आहेत, त्यांच्यापर्यंत हे अलगपणे लोण जाअून पोहचले आहे. बौद्ध, मांग, भटकेविमुक्त या सर्वांच्या आपापल्या संघटना आहेत आणि शोषणमुक्तीच्या अंतिम ध्येयसिध्दीसाठी त्या जाणीवपूर्वक अेकत्र येतात असेही नाही. विषमतेने ग्रासलेल्या भारतीय समाजातील वेगवेगळे घटक आजघडीला जागृतीच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहेत. त्यामुळे त्यांचे निकडीचे प्रश्नही सारखे नाहीत. ही स्थिती त्यांच्या अलगपणाच्या वृत्तीला पोषकच ठरते. दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चाललेली आहे. जीवनकलह अधिकाधिक गुंतागुंतीचा व तीव्र होत आहे. अशा वेळी हे सर्व कष्टकरी लोकसमूह अेकत्र आले नाहीत तर परिवर्तनाच्या प्रकियेला वेग कसा येणार ? ''

संसदबाह्य कृतिशील संघटनातील कार्यकर्त्यांच्या मनात प्रा. सरदार यांच्याविषयी अत्यंत आदर होता याचा अनुभव मी घेतलेला आहे. प्रा. सरदार यांच्या प्रेरणेने झालेल्या अशा काही बैठकींचा मी तटस्थ साक्षीही आहे. या प्रक्रियेला गति येअू शकली नाही हे मात्र खरे. 'कार्यकर्त्यांचा व्यक्तिगत अहंकार' असे याचे अेक सोपे अुत्तर अनेकदा दिले जाते. ते पुरेसे आहे, असे वाटत नाही. परंतु दुसरे सुचत नाही हेही तितकेच खरे.

प्रा. सरदार यांनाही सुचले नव्हते. यात त्यांचा पराभव नाही; आणि येथे महत्त्व आहे हे त्यांच्या जिव्हाळ्याने या प्रश्नाचे अुत्तर शोधण्याच्या वृत्तीचे. ही कृतिशील आणि भावनेत भिजलेली सामाजिक बांधिलकी होती.

## IV

या स्तरापर्यंतची बांधिलकी आपल्याला पेलली नाही तर आपण तिची कल्पना करू शकतो. प्रा. सरदार यांचे गेल्या दशकात झालेले दर्शन यापेक्षाही वरच्या स्तरावरचे होते. ते केवळ मलाच झाले या दृष्टीने मी भाग्यवानही आहे. कारण दोन्ही वेळी प्रा. सरदारांचे मन वळविण्याची कामगिरी मध्यस्थ म्हणून माझ्याकडेच सोपविण्यात आली आहे.

पहिली घटना जे. पी. नाओीक यांच्या निधनाच्या आधीच्या काही वर्षातील आहे. सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या काही मान्यवरांना मासिक मानधन देण्याची कल्पना होती. काळ १९८० च्या आधीचा व मासिक मानधन चारशे रूपये असे होते. पूर्वीच्या कोणत्याही न्यासाशी याचा संबंध नव्हता. सामाजिक कृतज्ञता निधीची तर त्यावेळी कल्पनाही निर्माण झाली नव्हती. या कार्यक्रमाशी व त्याच्या आयोजनाशी जे. पी. नाओीक संबंधीत होते. समितीने मोठ्या अुत्साहाने आणि अगत्याने प्रा. सरदार यांची निवड केली होती. त्यांची अनुमती मिळविण्याचे काम माझ्यावर सोपविले होते.

प्रा. सरदारांच्या घरी जाअून मी त्यांच्याकडे हा विषय काढला. निवडसमितीच्या सभासदाविषयी त्यांच्या मनात स्नेहादराची भावना होती. रक्कमही त्याना कमी वाटली असे नाही. परंतु त्यांनी सौम्यपणे परंतु तितक्याच निर्धाराने नकार दिला. माझ्या आणि माझ्या कुटुंबीयांच्या आर्थिक परिस्थितीत याची आवश्यकता नाही' एवढेच ते म्हणाले. मानधन न घेता माझे नाव त्या नामावलीत ठेवावयाचे असेल तर माझी त्याला अनुमती आहे.' असेही ते आपुलकीने व अुदार अंत:करणाने म्हणाले.

दुसरी घटना याहूनही कितीतरी वरच्या स्तरावरची आहे. 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद प्रा. सरदार स्वीकारतील का हे कळवा' असा निरोप आला. लागलीच अुत्तर हवे होते, 'ते स्वीकारतील असे तुम्ही गृहीत धरून चाला' असे त्याचवेळी सांगावे असेही मला वाटले. परंतु ते मी केले नाही आणि थोडक्यात वाचलो. दोन दिवस त्यांच्या घरी जाअून मी अनेक प्रकारे त्यांना आग्रह केला. हे स्थान सर्व दृष्टींनी अुचित कसे होओील हेही समाजावण्याचा प्रयत्न केला. परत तीच सौम्यता, तीच नम्रता, तोच निर्धार 'ही जागा मी स्वीकारली तर नाही म्हटले तरी माझी मते मला परखडपणे मांडता येणार नाहीत, आणि हे बंधन माझ्या मन:प्रकृतीला मानवणार नाही' एवढेच कारण त्यांनी दिले.

या घटनेचा कोणताही निर्देश केव्हाही त्यांनी कोणाकडेही केला नाही.

अशा विरागी वृतीचे, नि:स्पृहतेचे नुसते दर्शन होणे ही देखील महद्‌भाग्याची गोष्ट म्हणावी लागेल. अशी घटना घडू शकते यावर सहसा कोणाचा विश्वासही बसणार नाही.

## V

प्रा. सरदार खरे तर वृतीने, अुक्तीने, व्यक्तिमत्वाने अजातशत्रू. परंतु सार्वजनिक क्षेत्रात या गोष्टींपेक्षा तुम्ही कोणती भूमिका आग्रहाने घेता यावर तुमचे शत्रूमित्र ठरत असतात. सार्वजनिक क्षेत्रात अुतरणाऱ्यांना अटळ म्हणून याचा स्वीकारही करावा लागतो. आकसात अज्ञानाची भर पडली म्हणजे हे शत्रुत्व अधिकच विखारी बनते.

'समाजवाद, ईश्वरनिष्ठा आणि कर्मकांड' यावरील आपल्या विवेचनात प्रा. सरदार शेवटी सांगतात.

"धर्माचे संस्कार जनमतात खोलवर रूजलेले असतात. ते आततायीपणाने ओरबाडून काढता येणार नाहीत. त्यासाठी प्रबोधनाचा व मतपरिवर्तनाचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. हा मार्ग लांब पल्ल्याचा व खरतड आहे. लोकांचा ताबडतोब प्रतिसाद मिळणार नाही, इतकेच नव्हे तर कित्येकदा हताश होण्यासारखे प्रसंगही अुदभवतील. पण म्हणून अगतिकतेने स्वस्थ बसणे म्हणजे आहे तीच स्थिती कायम राखण्यास आपणही अप्रत्यक्षपणे कारणीभूत होणे आहे. हे समाजवादी ध्येयसाधनेत बसण्यासारखे नाही."

प्रा. सरदार यांच्या निधनाच्या आधी सुमारे वर्षभर एका हिन्दुत्वनिष्ठ मासिकात एका हिन्दुत्वनिष्ठाने 'महाराष्ट्रातील तथाकथित पुरोगामी

विचारवंत या शीर्षकाचा अशा विचारवंतावर बेताल आगपाखड करणारा अेक लेख लिहिला होता. या लोकांच्या समोर कोणत्या लोकक्षोभाचे दिव्य अुभे राहणार आहे. याविषयीचाही भडक अिशारा लेखकाने दिला होता. 'हा लेख वाचून हे तथाकथित विचारवंत करपून जातील' असा आपल्या मनांतील दाहही संपादकानी या लेखाची, भुलवणी करताना प्रकट केला होता.

तथाकथित पुरोगामी विचारवंताच्या नामावलीत या लेखकाने प्रा. सरदार यांच्या नावाला साहजिकच अग्रपूजेचा मान दिला होता.

आज प्रा. सरदार नाहीत परंतु कोणत्याही क्षणी काहीही घडू शकेल अशी स्फोटक परिस्थिती आपण अनुभवत आहोत.

प्रा. सरदार असते व त्यांना असे आघात सहन करावे लागले असते तर त्यांची भावना- 'Lord, forgive them, they know not what they are doing' (अीश्वरा, त्यांना क्षमा कर आपण काय करतो हे त्यांना कळत नाही) या येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील भावनेसारखीच राहिली असती याविषयी माझ्या मनात शंका नाही.

गांधीजींचीही आमरण निरन्तरची हीच भावना होती.

२ ऑक्टोबर हा प्रा. सरदारांचाही जन्मदिन. ही भावना त्यानीही आत्मसात केलेली होती. या जन्मदिनाच्या सहजयोगाची शान त्यानी आपल्या जीवनात सदैव जतन केली. आणि ही त्यांची सहजसाधना होती -आपणा सर्वांना विस्मित करणारी.

पत्ता :
४३, गुरूकृपा कॉलनी
गोडोली सातारा शहर
४१५००१.



२ ऑक्टोबर १९८३ रोजी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या वतीने प्रा. गं. बा. सरदार यांचा अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन समारंभ करण्यात आला. त्यावेळी आपले विचार व्यक्त करताना प्रा. सरदार व त्यांच्या शेजारी चार माजी कुलगुरू (डावीकडून) शंकरराव खरात, मा. स. गोरे, राम ताकवले व देवदत्त दाभोलकर.

# आदिवासी साहित्याविषयी प्रा. सरदारांची भूमिका

## ग.शां. पंडित

प्रा. गं. बा. सरदारांचा जन्म ठाणे जिल्ह्यात, जिथे ९० टक्के आदिवासी रहिवाशी आहेत त्या जव्हार गावचा. त्यांचे स्वत:चे मराठी सातवी पर्यंतचे शिक्षणही तिथेच झाले. त्यामुळे संस्कारक्षम वयातच त्यांचा त्या भागातील आदिवासींशी संबंध आला. आदिवासींच्या दारिद्र्याचं चित्र लहानपणापासून त्यांनी पाहिल्यामुळे या गरीब आदिवासींबद्दल त्यांना फार सहानुभूति होती. माणुसकीपासून वंचित अशा या आदिवासी समाजाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, व शैक्षणिक प्रबोधन व्हावे, अशी त्यांची मनापासूनची इच्छा होती. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेत काम करण्यामागील व 'हाकारा' सुरू करण्यामागचा देखील त्यांचा हाच हेतू होता.

### साहित्यनिर्मिती एक कार्य :

नवसमाजनिर्मितीसाठी आदिवासींमधूनच कार्यकर्ते निर्माण व्हायला पाहिजेत, असे सरदार म्हणत. 'प्रत्यक्ष वास्तवाला भिडणारा जो कार्यकर्ता आहे त्याचं कार्य अधिक मूलगामी आणि मौलिक स्वरूपाचं आहे' असं त्यांना वाटत होतं. 'साहित्यनिर्मिती हे सुध्दा एक कार्यच आहे' असं ते मानत होते. साहित्याचं क्षेत्र आणि प्रत्यक्ष कृतीचं क्षेत्र-मग ती सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक कोणतीही असो- याचा कुठेतरी सांधा जुळत गेला पाहिजे. यासाठी त्यांची धडपड होती आणि त्यालाच ते सामाजिक बांधीलकी मानीत होते. साहित्य ही एक शक्ती कशी आहे हे सांगताना प्रा. सरदार म्हणतात, "जर त्या साहित्यामागे व्यापक अशी प्रेरणा असेल, खऱ्या अर्थाचे द्रष्टेपण असेल, वास्तवाला भिडण्याचं सामर्थ्य असेल तर ते साहित्य सुध्दा नुसतं कार्यच नाही तर ती एक मोठी शक्ती आहे, असं मी मानतो. जगात जिथे जिथे क्रांत्या झाल्या तेथे तेथे निर्माणक्षम असं साहित्य निर्माण झालेलं आहे. तेव्हा साहित्य हे समाजजीवनापासून अलग काढताच येत नाही; आणि तसा जरी प्रयत्न झाला तरी तो कधीही यशस्वी होणार नाही."

### आदिवासी साहित्याचे नवे दालन :

१९७९ साली चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती येथे आदिवासी साहित्यिकांचे पहिले संमेलन भरले व यानिमित्ताने मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्याचे नवे दालन उघडले गेले. या नव्या प्रवाहाचं स्वागत करताना प्रा. सरदार म्हणतात, "आपला समाज ही विविध जाती-जमातींची उतरंड आहे. ज्यांनी बंडखोरी केली त्यांच्या बंडखोरीलाही सतत मर्यादा पडत आलेल्या आहेत. सगळ्यात उशीरा जागृती झाली ती आदिवासींमध्ये झाली. मानवमुक्तीचा हा एक क्रम आहे आणि त्याला इलाज नाही आणि आपल्या जातिबध्द समाजात तर तो विशेषत्वाने आहे. महाराष्ट्रात पहिल्यांदा बंडखोरीची तुतारी फुंकली ती केशवसुतांनी. आजच्या दृष्टीने ती बंडखोरी नसेल; पण ती शंभर वर्षांपूर्वीच्या काळात होती हे महत्त्वाचं आहे. केशवसुतांनंतर मराठी साहित्यात फडके-खांडेकरांचं ( रंजनवादी ) युग आलं. त्याला दलित साहित्याने जबरदस्त

धक्का दिला. त्याच्या पुढच्या धक्का आदिवासी साहित्याने दिला पाहिजे. विधायक कामाचं महत्त्व मी मानतो; पण संघर्षाशिवाय गत्यंतर नाही. दलितांनी तो केला. आदिवासींनी तो सुरू केलेला आहे. तो त्यांना तडीस न्यावयाचा आहे. शोषितांच्या सर्व शक्ती एकवटल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत.''

## आदिवासी साहित्याचं वेगळेपण

महाराष्ट्रात ज्या अनेक साहित्यिक चळवळी आस्तिवात आल्या, त्यांचा इतिहास पाहता असे दिसते की, १२ व्या शतकात जी 'संतसाहित्याची चळवळ' उदयास आली, ती पारलौकिक जीवनाचे, भक्तीचे व कर्मविपाकाचे गोडवे गाण्यातच लुप्त झाली. मध्ययुगातल्या 'पंडिती, शाहिरी व बखर साहित्याच्या चळवळी' ने शृंगार, प्रेम, विरह-मीलन ह्यांना प्रोत्साहन देण्यातच आपली प्रतिभा वाया घालविली. गांवकुसाबाहेरील, रानावनांतील आदिवासींच्या, उपेक्षितांच्या अंतरंगाला ह्या चळवळींनी कधी स्पर्शच केला नाही. १९१४ ते १९७५ ह्या काळात उदयास आलेल्या साहित्यिक चळवळी या कोणत्या ना कोणत्या विचार धारेलाच पुनर्जीवित करणाऱ्या ठरल्या. ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवनाचं वास्तव व काही प्रमाणात काहीशा प्रगत अशा अदिवासींचं सामाजिक जीवन तेवढं प्रतिबिंबित झालेलं दिसतं. मात्र या वनवासियांचं स्वतंत्र दालन ह्या साहित्यात उघडलं गेलं नाही. १९६७ साली फोफावलेली 'दलित साहित्याची चळवळ' ही गावकुसाबाहेरच जन्म पावली. त्यामुळे गांवकुसाबाहेतील उपेक्षित वाळलेलं जीवन पुन्हा तेजाळलं. या चळवळीपासून आदिवासींच्या मुक्तीच्या व त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या संदर्भात फारच मोठी अपेक्षा होती; पण गांवकुसाच्या आतील प्रस्थपित समाजव्यवस्थेशी विद्रोह करण्यचातच ती रत राहिली. आदिवासींच्या सामाजिक जीवनाकडे, दु:खमय प्रपंचाकडे, संस्कृतीकडे लक्ष देण्यात ती असमर्थ ठरली. खरे तर 'दलित साहित्याची चळवळ' आदिवासी जीवनाला न्याय देऊ शकली नाही, याचे कारण 'दलित आणि आदिवासी हे दोघेही शोषित असले तरी त्यांच्या दु:खाची कारणे व स्वरूप यात फरक आहे.' असे आदिवासी साहित्यिकांचे मत आहे. प्रा. सरदारांनी या दोन वर्गांमधला फरक अतिशय मार्मिक शब्दात वर्णन केला आहे. ते म्हणतात, ''मागास समाजामध्ये व्यथा ही केवळ एका व्यक्तीची नसून ती त्या त्या जनसमूहाची सामूहिक व्यथा असते. आपल्या विषमतेवर आधारलेल्या प्रत्येक समाज घटकाची व्यथा वेगळी, दु:खं वेगळी, अनुभूती वेगळी. दलितांचा अनुभव वेगळा, आदिवासींचा अनुभव वेगळा. त्यांची संस्कृती वेगळी, त्यांचा इतिहास वेगळा. ते ज्ञानसंपदेला व सांस्कृतिक परंपरेला वंचित राहिलेले. दलित हे गावकीमध्ये राहिलेले, आदिवासी समाजापासून अलग पडलेले. त्यामुळं त्यांचा अनुभव हा वेगळा राहणारच. त्यांचा अविष्कारही वेगळाच असणार. दलित साहित्याप्रमाणेच आदिवासींच्या साहित्याचं हे वेगळेपण मान्य केलंच पाहिजे.''

## जाति-धर्म निरपेक्ष साहित्य :

''भारतीय समाजामधील दु:खं जातिगत आहेत व त्यामुळे त्या त्या जातीचे वर्गाचे प्रवाह आज साहित्यात निर्माण झाले आहेत.' असे आदिवासी साहित्यिकांचे म्हणणे आहे. हा मुद्दा स्पष्ट करताना असेही म्हटले आहे की 'ग्रामीण मजुराचं दु:खं आर्थिक स्वरूपाचं आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य हे ग्रामीण भागातील श्रमजीवी वर्गाचं साहित्य आहे. त्याचप्रमाणे दलितांचं दु:खं अस्पृश्यतेचं आणि आर्थिक स्वरूपांचही आहे, त्यामुळे दलित साहित्य हे गांवकुसाबाहेर राहणाऱ्यांचं जीवन व्यक्त करणारं,

उपेक्षितांचं साहित्य आहे. आदिवासीचं दुःख हे आदिम मानवाचे दुःख आहे. त्याला अजून माणुसकीच्या प्रवाहापासून वंचित ठेवलेलं आहे. त्याला पुन्हा मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर त्याचे सर्व प्रश्न व उत्तरे वेगळ्या पध्दतीने शोधावी लागतील. त्याच्या जीवनामध्ये आत्मप्रत्ययाची जाणीव जागृत करावयाची असेल तर त्यासाठी वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील. म्हणूनच आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो.' साहित्याच्या बाबतीत जाति-धर्मातील लुडबुड ही केव्हाही निषेधार्यच आहे, हे सांगताना प्रा. सरदार म्हणतात, ''वास्तविक पाहता साहित्याची निर्मिती आणि आस्वाद हा एक शोधच आहे. जीवनसत्याचा व विश्वनियामक तत्त्वाचा तो शोध आहे; आणि त्यांची मनुष्यमात्राला स्वभावतःच ओढ असते. तेव्हा आपल्या मराठी साहित्याचे क्षेत्र नेहमीच जातिधर्मनिरपेक्ष राहिले पाहिजे. त्यात निरनिराळ्या जातींच्या धर्मांच्या लोकांना निःसंकोचपणे वावरता येईल, असे खुले व स्वागतशील वातावरण आपण निर्माण करावयास हवे. मराठीच्या त्या भव्य अशा मुख्य-प्रवाहात मिळून जाण्यात आपले भवितव्य व हित आहे, याची आपल्या साहित्यिकांनी सतत खूणगाठ बांधून ठेवणे योग्य होईल, आणि त्यादृष्टीने कोणत्याही साहित्याला व साहित्यिकाला जातिधर्मवाचक संज्ञा चिकटविण्याच्या कल्पनेचा त्याग करणे उचित होईल.'' सरदारांचे हे विचार आदिवासी साहित्यिकांनाही प्रेरक व मार्गदर्शक ठरणारे आहेत.

## सामाजिक आशय

'साहित्य ही एक कला आहे व कला ही कलेसाठी असते त्यात सामाजिक आशय येणे चुकीचे आहे' असाही एक विचार प्रस्थापितांमधून वर आलेला आहे. १९६७ साली दलित साहित्य उदयास आले, त्यावेळी हे साहित्यच नव्हे, 'यात आक्रस्ताळेपणा, अश्लीलता आहे' असा आक्षेप घेतला गेला. आज आदिवासी साहित्यावरही असेच आक्षेप घेतले जात आहेत. याला प्रत्युत्तर देताना गं.बा. सरदार परखड शब्दात सांगतात की, ''शोषित समाजातून नवा वर्ग आज जो जागृत होऊन पुढे येतो आहे तो आपलं आस्तित्व सिध्द करण्यासाठी, आपले न्याय्य हक्क बजावण्यासाठी आणि आपल्याला सामाजिक जीवनात योग्य स्थान प्राप्त करून घेण्यासाठी. त्यामध्ये दलित आहेत. आदिवासी आहेत, भटक्या-विमुक्त जातीचे लोक आहेत. आणि स्त्रियासुध्दा आहेत. आजवर दडपल्या गेलेल्या या समाजांच्या दुःखांना, वेदनांना आता वाचा फुटली आहे. त्यातून सुरूवातीला आक्रोशच बाहेर पडणार. त्यामध्ये सौम्यता येण्यास वेळ लागेल. त्यांच्या साहित्यातून जाणवणारा भावनांचा उद्रेक आपण समजून घेतला पाहिजे. त्यांनी आपल्या व्यथा-वेदना, आपल्या आशा-आकांशा व्यक्त करणं याला वेगळा अर्थ आहे, तेव्हा त्याला सामाजिक आशय हा राहणारच, कोणाला इष्ट वाटो अगर न वाटो, त्याला काही पर्याय नाही. आदिवासी साहित्याचा सामाजिक प्रश्नांशी संबंध आहे तो यामुळेच आहे. अभिजात साहित्याची गुणवत्ता आम्ही नाकारणार नाही; पण त्याच्या प्रेरणेमध्ये स्वयंकेंद्रितता, असामाजिकता जर असेल तर तिला आम्ही जरूर विरोध करू.'' साहित्य ही कला आहे हे मान्य करून प्रा. सरदार म्हणतात, ''साहित्य हा कलेचा एक भाग आहे आणि साहित्यामध्ये अनेक कलांचा संगम झालेला असतो; पांढरपेशांना कलेकडे जावे लागते, पण आदिवासींकडे कला अगोदरच आहे; ती त्यांच्या रक्तात भिनलेली आहे. मग ती त्यांच्या साहित्यात उतरल्याशिवाय कशी राहील ?''

## साहित्यप्रवाहांत सुसंवाद

प्रा.गं.बा. सरदार हे 'समाजमनस्क विचारवंत' आहेत. सामाजिक प्रश्न आणि सामान्य माणूस यांचेवर लक्ष केंद्रित करूनच त्यांनी आजवर आपले लेखन केलेले आहे. 'वस्तुनिष्ठ व विवेचकदृष्टीने इतिहासाकडे पाहणे' हे तत्त्व त्यांनी अंगिकारले व इतरांनाही तसे करण्यास शिकविले. ''मराठी साहित्यात आज वेगवेगळे प्रवाह आहेत, त्यांच्यात सुसंवाद साधण्याची आपण पराकाष्ठा केली पाहिजे. त्यांचा एकमेकांना छेद न जाता ते परस्पर-पूरक व्हावेत म्हणून आपण पध्दतशीर खटपट केली पाहिजे. जोपर्यंत सामाजिक जीवनात तणाव आहेत. तोपर्यंत साहित्यात सुसंवाद निर्माण होईल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. यादृष्टीने सामाजिक घटकांतील एकात्मतेच्या आड येणाऱ्या शक्तींशी झगडण्याचीही साहित्यिकांची तयारी पाहिजे. साहित्यिकाच्या सामाजिक बांधीलकीचा हाच वास्तविक अर्थ आहे.'' अशा प्रकारची समतोल विचारसरणी ही प्रा. सरदारांच्या ज्ञानोपासनेच्या पध्दतीचे द्योतक आहे.

## आदिवासी साहित्याकडून अपेक्षा :

कोणत्याही मानवधर्माला शोषणमुक्त होण्यासाठी त्या वर्गात वैचारिक क्रांतीची लाट उसळावी लागते. ह्यासाठी साहित्यातून त्या समाजाचं प्रबोधन व्हावं लागतं. शोषणनिष्ठ समाजरचनेच्या विरोधात विद्रोह मांडणारं साहित्य निर्माण व्हावं लागतं. दलित साहित्याने हेच केलं. याबाबतीत प्रा. सरदार म्हणतात की, ''दलित साहित्याने विद्रोहाचे जे निशाण उभारले ते आदिवासी साहित्यिकानांही मार्गदर्शक ठरणार आहे.'' दलित आणि आदिवासी साहित्याचे स्वरूप जरी वेगळे असले तरी त्यातून दिसणारे माणसाचे आक्रंदन हे एकच आहे. दलित आणि आदिवासी हे दोघेही गांवकुसाबाहेरचे, उपेक्षित आहेत. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आहे. तेव्हा अशा साहित्याकडून प्रा. सरदार काही अपेक्षा व्यक्त करताना म्हणतात, ''दलित व आदिवासी साहित्यातून विशाल, व्यापक व समग्र दृष्टीकोण दिसायला हवा. अन्यायाची चीड दिसायला हवी. त्याची चित्रं रंगविताना नजिकच्या माणसांवर जो अन्याय झालेला असेल त्यावरच ते चित्र केंद्रित होणार, परंतु त्यातून संपूर्ण मानवमुक्तीचा संदेश दिला गेला पाहिजे. हा लढा मानवमुक्तीचा आहे मानवतेचे भान सुटले तर संधीसाधू, आततायी प्रवृत्ती त्याचा फायदा उठविल्याशिवाय राहणार नाहीत याची जाणीव ठेवून संपूर्ण मानवमुक्तीची दृष्टी वाङमयाने लोकांना दिली पाहिजे. साहित्यामध्ये मानवतेचे भान कधीही सुटता कामा नये. आजकाल कोणत्याच समाजात अगदी प्रगत समाजात देखील विचारप्रधान साहित्याची वाण आहे. दलित व आदिवासी साहित्यामध्ये सुध्दा अशा प्रकारचं तत्त्वचिंतनात्मक, विचारप्रधान वाङमय येण्याची नितांत गरज आहे.''

पत्ता : ११३९ / क, मॉडेल कॉलनी, पुणे -१६

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# प्रा. गं. बा. सरदार यांच्या काही आठवणी

## शंकरराव खरात

माझ्या कॉलेजजीवनात प्रा. आण्णासाहेब गं. बा. सरदार यांची (पुणे) वसंत व्याख्यान मालेतील व्याख्याने ऐकून मी त्यांच्याकडे आकर्षित झालो. त्यांच्या व्याख्यानांचे विषय सामाजिक प्रश्न, सामाजिक सुधारणा, समाज-सुधारक, संतांची सामाजिक दृष्टी अशाच स्वरूपाचे सहसा असत. विषय माझ्या आवडीचे व अभ्यासाचे असल्याने प्रा. सरदार यांच्या व्याख्यानाला मी आवर्जून हजर राहात असे. त्यांच्या व्याख्यानाला श्रोत्यांची नेहमीच गर्दीही असे.

माझ्या कॉलेज जीवनात वसंत व्याख्यान मालेची व्याख्याने त्याकाळचे (जुने) टिळक स्मारक मंदिराच्या पुढच्या पटांगणात होत असत. प्रा. आण्णासाहेब सरदारांच्या काही कांही व्याख्यानांना प्रा. दि. के. बेडेकर अध्यक्ष म्हणून बसलेले मी पाहिलेत. प्रा. सरदारांचा सामाजिक प्रश्नांचा अभ्यास, व्यासंग मोठा होता. ते आपल्या विषयाची मांडणी, आपल्या वैशिष्ट्य-पूर्ण अशा प्रभावी वक्तृत्वशैलीत करत. त्यांच्या विषयाची मांडणी मुद्देसूद, सुसंगत असे. विशेषत: ते आपला मुद्दा मांडत असताना स्वत:च प्रश्न निर्माण करून, त्याला ते साधार, समर्पकपणे उत्तरे देत. त्यामुळे समोरचा श्रोता प्रभावित होत असे. विशेषत: सामाजिक-सुधारणा, समाज-सुधारक, या विषयावरील त्यांची भाषणे भलतीच आकर्षक होत असत. त्यातच प्रा. गो. ग. आगरकर आणि लोकमान्य टिळक यांच्यातील सामाजिक सुधारणाबाबतचा वाद-संघर्ष साधार सांगताना ते सुधारक व केसरीतून उतारे-विचार पटापटा त्यांच्या शैलीदार भाषेत उधृत करत. त्याप्रसंगी तर त्यांची वकृत्व शैली भलतीच चढत असे. प्रा. सरदारांच्या वकृत्वात आपला मुद्दा मांडताना, ते ठामपणे मांडत. सामाजिक प्रश्नावरील विचार मांडताना त्यांच्या त्या विषयाच्या विश्लेशात पध्दतीने श्रोते प्रभावित होत.

मी त्यांची अखेरच्या जीवनापर्यंत अनेक व्याख्याने ऐकलीत. त्यात त्यांचे मला एक विशेष असे दिसे की, व्याख्यान विषयाची टिपणे सहसा त्यांच्या हातात दिसत नसत. त्यांचा त्या विषयाचा व्यासंग, त्याचे मनन, चिंतन याच्या जोरावरच ते आपल्या विषयाची मांडणी अतिशय सुसंगतपणे, मुद्देसूद करत. याचेच मला विशेष वाटत असे.

दुसरे विशेष म्हणजे त्यांची व्याख्याने ऐकताना इतक्या वर्षात त्यांच्या पोषाखात मला कधीच बदल दिसला नाही. त्यांच ते धोतर, पांढऱ्या शर्टावरील कोट, अन् डोक्याला गांधी टोपी हाच त्यांचा कायमचा पोषाख. साधी राहणी अन् उच्च-विचारसरणी त्यात उठून दिसत होती. स्वातंत्र्याच्या लढ्यातील त्यांचा भाग, आणि प्रारंभीच्या काळातील महात्मा गांधीजींचा त्यांच्यावरील प्रभाव, हे त्यांच्या पोषाखातून दिसत होते.

माझ्या सार्वजनिक जीवनात त्यांचा माझा थोडा परिचय झाला होता. त्यांच्या साठाव्या वाढदिवसाला मी त्यांच्या आपटे-रोडवरील घरी गेलो. त्यांना आदरपूर्वक हार घातला. त्यांच्या शिष्यांची इतर समाज कार्यकर्त्यांची, त्यांच्या दारी त्या दिवशी गर्दीच गर्दी झाली होती. तेही मोठे प्रसन्न दिसत होते. त्या दिवसांपासून

त्यांचा माझा अधिक परिचय वाढत गेला.

पुढे मी त्यांच्या निवासस्थानी अनेक वेळा गेलो होतो. साहित्य, समाज, राजकारण यावर त्यांच्याशी चर्चाही केलेली होती. त्यांचे या विषयांवरचे सखोल, चिंतनशील विचार मला ऐकायला मिळत होते.

दलित समाजातील लेखक नेहमीच प्रा. सरदार यांच्या घरी जात. त्यांचे साहित्यावरील विचार ऐकत व मार्गदर्शनही घेत. दलित साहित्याला व दलित लेखकांना त्यांचा भक्कम पाठिंबा असे. म्हणूनच मुंबई येथे झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मोठ्या मान-सन्मानाने त्यांच्याकडे आले होते. त्या संमेलनातील त्यांचे भाषण चांगलेच गाजले. साहित्यिकाला सामाजिक बांधिलकी पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते.

दलित साहित्यिक, ग्रामीण साहित्यिक व आदिवासी-साहित्यिक, यांच्याशी प्रा. सरदार यांची चांगलीच जवळीक होती. त्यांच्या साहित्य संमेलनास ते आवर्जून हजर राहात. आपल्या भाषणात या साहित्यिकांना मार्गदर्शन करून, उत्तेजन देत असत. या सर्वच साहित्यिकांचे ते एक आशास्थान होते.

जळगांव येथे १९८४ साली झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या जागेसाठी उमेदवार म्हणून मी उभा होतो त्यावेळी प्रा. सरदार यांनी मला आपला पाठिंबा दिला होता. त्यावेळी मला बोलताना ते म्हणाले होते की,

''तुमच्यासारखा साहित्यिक या अध्यक्षपदाच्या निवडणुकीला उभा राहिला ही चांगली घटना आहे. समाजपरिवर्तनाच्या बाबतीत इतर राज्यापेक्षा महाराष्ट्र पुढे आहे. अशा परिस्थितीत समाजपरिवर्तनाच्या लढ्यात तुमच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत जाणकार मतदार कुणाच्या बरोबर आहेत ? हे आपल्याला कळेल. अशा निवडणुकीत जय-पराजय याला विशेष महत्व नाही. तुम्ही निर्धारपूर्वक निवडणूक लढवायची. कुठल्याही परिस्थितीत माघार घ्यावयाची नाही. तुमची ही निवडणूक तशी साधी नाही. तुमचा पराभव झाला तर महाराष्ट्रात एक वेगळाच प्रश्न उभा राहिल... ''

असं ते कांही महत्वाचे सूचकात्मक गंभीरपणे बोलले.

साहित्य संमेलनाच्या निवडणुकीची वृतपत्रात रोजच उलट-सुलट जोरात चर्चा होत होती. निवडणूक वातावरण तापत होते. निवडणूक दहा-बारा दिवसांवर आली असताना एका वृतपत्रकारांच्या बैठकीत मुलाखतीत मी स्पष्टपणे पत्रकारांना माझी भूमिका सांगताना म्हटले की,

''मी ही निवडणूक एक साहित्यिक म्हणूनच लढवीत आहे. मला साहित्यिक म्हणून अध्यक्ष निवडावे, किंवा माझा साहित्यिक पराभव करावा. मी दलित- साहित्यिक म्हणून ही निवडणूक मुळीच लढवणार नाही ; आणि दलित-साहित्यिक म्हणून मतेही मागणार नाही. माझी निवड झाली तर साहित्यिक म्हणूनच व्हावी. अशी माझी ठाम भूमिका आहे.'' असे माझे विचार मी पत्रकारांच्या बैठकीत मांडले. दुसऱ्याच दिवशी वृतपत्रात माझ्या या विचाराला मोठी प्रसिध्दी मिळाली. माझ्या या भूमिकेचे प्रा. आण्णासाहेब सरदारांनी कौतुक केले. व ते मला म्हणाले की,

''तुम्ही अतिशय चांगली व ठाम भूमिका घेतली. या तुमच्या भूमिकेमुळे महाराष्ट्रातील साहित्यिकांत वाद निर्माण होणार नाही. तुमच्या या भूमिकेमुळे तुमच्या पाठीशी अनेक साहित्यिक उभे राहतील.''

शेवटी निवडणुकीचा निकाल लागला. मी लागलीच प्रा. सरदार यांना भेटलो. त्यांनाही माझ्या निवडीने आनंद झाला होता. त्याचवेळी त्यांनी मला सागिंतले की : -

"मी जळगावला-संमेलनाला येणार !"

ते जळगावला साहित्यसंमेलनाला हजर राहिले. त्यांनी वेगवेगळ्या चर्चासत्रात भाग घेऊन आपल्या मूलगामी विचारांनी विराट, श्रोतृसमुदायांना प्रभावीत केले.

संमेलन यशस्वीपणे पार पडले. मी पुण्यात आल्यावर प्रा. सरदार यांना भेटावयास गेलो. त्यांना भेटलो. "संमेलन छान झालं !" असं म्हणून ते पुढं मला म्हणाले,

"तुमचं अध्यक्षीय भाषण चांगलं झालं. पण तुम्ही भाषण कधी तयार केलं ? तुम्हाला भाषण तयार करण्यास, त्यासाठी चिंतन करण्यास, विचार करण्यास वेळच नव्हता. अशातही तुम्ही कसं काय भाषण तयार केलंत ?"

त्यांचा प्रश्न बरोबरच होता. त्याचे कारण निवडणुकीचा निकाल ता. २४ जानेवारी ( १९८४ ) रात्री आकरा वाजता मला कळाला. ता. २५ रोजी माझ्या घरी अभिनंदन करणाऱ्या मंडळींची सारखी ये-जा होती. ता. २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन. आणि ता. २७ ला तर सकाळीच जळगावला निघालो. कारण ता. २८ जानेवारीपासून संमेलन सुरू होणार होते. अशी धावपळ, घाई होती.

प्रा. सरदारांनी मला प्रश्न केल्यावर मी एवढेच सांगितले की, "माझी विचाराची बैठक तयार होती. मी दोन बैठकीत सुमारे आकरा-बारा तास बसून सगळं भाषण तयार केलं !"

त्यावर ते मला चटकन म्हटले,

"तुम्ही संत चोखोबा व त्यांच्या कुटुंबियांच्या अभंगांचा तसेच डॉ. आंबेडकरांच्या विषयाच्या संदर्भात उल्लेख केला. तो फारच चांगला होता."

"ते माझ्याकडून माझ्या भाषणात अपेक्षित होतेच." असं मी त्याना म्हटलं. त्यानंतर आम्ही साहित्य संमेलनाबाबत बराच वेळ बोलत बसलो.

मी आणि प्रा. आण्णासाहेब सरदार १९८४ च्या मे महिन्यात पहिल्या आठवड्यात बारामतीला 'विषमता-निर्मूलन परिषदेला' गेलो होतो. या परिषदेला जाता-येताना आम्ही महाराष्ट्रातील जातीय-पध्दती, अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक-परिवर्तन अशा महत्वाच्या विषयावर महत्वाची चर्चा केली. प्रा. सरदार मूळ पिंडानेच परिवर्तनवादी होते. त्यांना सामाजिक समता, आर्थिक समता पाहिजे होती. त्यासाठी समाजात परिवर्तन झाले पाहिजे. त्यात युवकांनी श्रध्देने व निष्ठेने भाग घेतला पाहिजे अशी त्यांची भूमिका असे.

महाराष्ट्रात 'भटक्या-विमुक्ताचा' शोध-मार्च निघाला होता. हा शोध-मार्च पुण्यात सासवड मार्गे येणार होता. या भटक्या-विमुक्तांच्या शोध-मार्चचे स्वागत हडपसर म्युनिसिपल नाक्याजवळ होणार होते. त्यासाठी मी आणि प्रा. सरदार मिळून एका ॲटो-रिक्षात बसून हडपसरला गेलो होतो. त्यावेळी स्वागताचे भाषण त्यांनी केले. त्यात 'भटक्या-विमुक्तांच्या सर्व प्रश्नांची सोडवणूक लौकरात लौकर झाली पाहिजे.' अशाच आशयाचे त्यांनी भाषण करून भटक्या-विमुक्त जनांची अंत:करणं जिंकली होती. पिंपरी-चिंचवड येथे १९८२-८३ साली झालेल्या भटक्या-विमुक्तांच्या वार्षिक परिषदेचे ते अध्यक्षच होते. त्यांच्या प्रश्नाबद्दल त्यांना मोठी जाणीव होती.

प्रा. आण्णासाहेब सरदार हे विचारवंत होते. एक थोर विचारवंत म्हणून त्यांचा महाराष्ट्रात मोठा दबदबा होता.

त्यांचे निर्वाण झाले, तेव्हा मी काही कामासाठी नांदेडला ( मराठवाडा ) होतो. तिथं असताना त्यांच्या निर्वाणाची बातमी कळाल्यावर मला मोठा धक्का बसला... आता त्यांच्या अमर विचारांची ज्योत आपण तेवत ठेवली पाहिजे.

पत्ता :
१२, विजय सोसायटी,
गणेशखिंड रोड, पुणे १६

# आठवणी अण्णांच्या

## डॉ. हे. वि. इनामदार

प्रा. गंगाधर बाळकृष्ण उर्फ अण्णासाहेब सरदार इ.स. १९४१ ते १९६८ अशी एकूण अठ्ठावीस वर्षे पुण्याच्या श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करीत होते. आरंभीची दोन वर्षे प्राचार्य वामन मल्हार जोशी यांचे सहकारी म्हणून त्यांनी काम केले. १९४३ मध्ये वामन मल्हार कालवश झाले. त्यानंतर महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख पद प्रा. सरदारांकडे आले. १९६३ ते १९६८ अशी शेवटची पाच वर्षे मराठीचे प्रपाठक आणि विद्यापीठीय मराठी विभागाचे प्रमुख म्हणून प्रा. सरदारांना पदोन्नती मिळाली होती. १९०८ मधला त्यांचा जन्म. अडुसष्ट साली त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली. नियमाप्रमाणे ते सेवानिवृत्त झाले.

१९५४ ते १९८५ अशी एकंदर एकतीस वर्षे याच महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करण्याची संधी मला मिळाली. त्यांपैकी १९५४ ते १९६८ अशी चौदा वर्षे प्रा. सरदारांचा कनिष्ठ सहकारी म्हणून, आणि त्यानंतर अखेरपर्यंत विभागप्रमुख म्हणून मी काम केले. माझ्या अगोदर, म्हणजे १९४१ ते १९५३ अशा एका तपाच्या कालावधीत प्रा. सरदारांच्या या विभागात प्रा. मुक्ताबाई दीक्षित, डॉ. सरोजिनी शेंडे व प्रा. मालती किर्लोस्कर या तिहींनी त्यांच्या सहकारी म्हणून काम केले. तसेच प्रा. वामन मल्हार जोशी, डॉ. कमलाबाई देशपांडे, प्रा. रा. कृ. लागू, डॉ. वा. दा. गोखले प्रभृती नामवंत साहित्यिकांच्या बरोबरीने प्रा. सरदारांनी या संस्थेत काम केले. त्या काळात एवढ्या छोट्या शिक्षण संस्थेत एवढी मोठी माणसे काम करत होती, हे एक सुखद नवल होते. विद्यापीठाचे संस्थापक महर्षी कर्वे यांनी जातीने लक्ष घालून ही मोठी माणसे संस्थेला मिळवून दिली होती. वामन मल्हारांना विद्यार्थिनी जशा 'तात्या' या घरगुती नावाने संबोधत होत्या, तशाच प्रा. सरदारांनाही 'अण्णा' या त्यांच्या घरगुती नावाने त्या ओळखत असत.

अण्णांच्या वत्सल आणि समर्थ मार्गदर्शनाखाली महिला महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करण्याची जी संधी मला लाभली, ती माझ्या व्यावसायिक जीवनातली मोलाची ठेव आहे. एरवीच्या व्यावहारिक वातावरणात ज्या गोष्टी सहजासहजी अभ्यासावयाला मिळणार नाहीत, अशा लाख मोलाच्या काही गोष्टी अण्णांच्या सहवासात मला सहजपणे शिकायला मिळाल्या. या संदर्भातील दोनच आठवणी वानगी दाखल पुरेशा होतील. यातली पहिली आठवण आहे, अध्यापन विषयक अडचणीच्या संदर्भातील. १९५४ मध्ये मी महाविद्यालयात रूजू झालो. शिक्षकाला सर्व ज्ञानक्षेत्रांत गती असली पाहिजे, त्याच्या प्रज्ञेला अ-विषय असू नये, असे अण्णांचे मत होते. पुढच्याच वर्षी ज्ञानेश्वरीचा दुसरा अध्याय त्यांनी मला शिकवायला दिला. शिक्षक म्हणून मी नवखाच होतो. त्या अध्यायातला सांख्ययोग तसा जटिलच आहे. शिकवताना मला पुरेसा आत्मविश्वास वाटेना. काही शंकास्थळी मी अडखळू लागलो. विद्यार्थिनी अण्णांकडे गेल्या. माझ्याऐवजी अण्णांनी तो अध्याय शिकवावा, असा विद्यार्थिनींनी आग्रह धरला.

त्यांची विनंती अण्णांनी सौम्य शब्दांत, पण ठामपणे नाकारली. ते त्यांना म्हणाले. ''इनामदार सरच हा अध्याय शिकवतील. मी तुमच्या एकाही शंकेचे परस्पर निरसन करणार नाही. इनामदार सरांना काही अडले, तर मी त्यांना एकदा सोडून अनेकदा सांगेन; पण त्यांना डावलून, त्यांच्या विद्यार्थिनींना मी काही सांगणे हे माझ्या शास्त्रात बसत नाही.'' अण्णा इथेच थांबले नाहीत. दोन-तीन वेळा एकत्र बसून ज्ञानेश्वरीची भूमिका आणि दुसऱ्या अध्यायनाची रूपरेषा त्यांनी मला तळमळीने आणि मार्मिकपणे स्पष्ट करून सांगितली. त्यातून माझा आत्मविश्वास वाढला. व्यवसायाच्या आरंभ काळात त्याची मला गरज होती. अण्णांनी आपलेपणाने व सौजन्याने माझी ती गरज पूर्ण केली. हे करताना व्यावसायिक नीतीचा सुरेख वस्तुपाठ त्यांनी अप्रत्यक्षपणे सादर केला.

दुसरी आठवण शुध्दलेखनाच्या बाबतीतील आहे. महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे अण्णा हे मुख्य संपादक होते. मी उपसंपादक होतो. 'तिची कुत्रीं' या नावाची एक गोष्ट एका विद्यार्थिनीने आणून दिली. महामंडळाचे लेखन विषयक नियम नुकतेच आले होते. सर्व विद्यापीठांनी ते नियम अमलात आणण्याचे ठरविले होते. विद्यार्थिनीला 'कुत्र्याची अनेक पिले' अभिप्रेत होती( ते कुत्रें एकवचन: ती कुत्रीं अनेक वचन ) स्त्रीलिंगी एक कुत्री गोष्टीत आली नव्हती. कुत्र्याच्या अनेक पिलांची ती गोष्ट होती. अशा स्थितीत 'ती' व 'कुत्री' या दोन शब्दांवर अनुस्वार दिले, तरच गोष्टींशी ते सुसंगत होते. दोन अनुस्वार दिले नाहीत, तर गोष्टीचा आशय बदलत होता. मात्र महामंडळाच्या नियमात हे अनुस्वार बसत नव्हते. तेव्हा आम्ही दोघांनी या मुद्याचा खल केला. अर्थभेद टाळावा म्हणून दोन्ही अनुस्वार घेण्याचा निर्णय घेतला. छापखान्याकडे मुद्रिते पाठवून दिली.

पण ही घटना इथेच संपली नाही. त्या दिवशी रात्री दहा वाजता अण्णा माझ्या घरी आले.ते मला म्हणाले, ''अहो इनामदार, संध्याकाळी प्रा.रा.श्री. जोग आणि डॉ. वा.दा. गोखले या दोघांना मी भेटलो. शुध्दलेखन-समितीचे ते दोघेजण सभासद आहेत. आज जे नियम आहेत, त्याप्रमाणे पाहिले तर हे दोन अनुस्वार देणे चूक आहे. गोष्ट वाचून त्यातील अनेक पिलांचा संदर्भ लागेल. पण त्यासाठी अनुस्वार देता येत नाहीत, असे त्या दोघांनी मला सांगितले.'' अण्णा एवढे सांगून थांबले नाहीत. आम्ही दोघे त्या रात्री मुद्रकाच्या घरी गेलो. त्याला घेऊन आम्ही छापखान्यात गेलो. मशिनवरचा फॉर्म काढला. अनुस्वारांची दुरूस्ती केली. त्या रात्री आम्हांला घरी यायला बारा वाजले.

दुसऱ्या दिवशी दुपारी आम्ही दोघे महाविद्यालयात भेटलो. मी अण्णांना म्हणालो, ''अहो, विद्यार्थिनीचे हे नियतकालिक. दोन अनुस्वार राहिले असते, तर काय बिघडले असते?' अण्णा म्हणाले, ''खरंच, तुम्हांला विनाकारणच मी त्रास दिला.'' तिथून ते वर्गावर गेले. आपण त्यांना अकारण बोललो, याची खंत मला वाटली, पण तरूण वयातला माझा अहंकार अधिक प्रभावी ठरला. माझी खंत मी त्यांच्याजवळ व्यक्त केली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी एक नवल घडले. दारावरची घंटी वाजली. मी दार उघडले. पहातो, तर अण्णा आलेले! ते म्हणाले, ''काम काही नाही. सहजच चहा प्यायला आलो आहे. गप्पा मारून व चहा पिऊन ते निघून गेले. दुसऱ्या दिवशी भेट झाल्यावर मी त्यांना म्हणालो, ''अण्णा,कालच्या तुमच्या भेटीची सामाजिक फलश्रुती आज मला उमगली. अनुस्वारांवरून मी तुम्हांला तसं म्हणायला नको होतं.'' त्यावर अण्णांनी खुलासा केला. ते म्हणाले, ''अहो,


मी मागं एकदा तात्यांना (वामन मल्हारांना) असाच विनाकारण रागावून काही म्हणालो होतो. तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी तात्या माझ्याघरी येऊन चहा पिऊन गेले होते. त्यामुळे माझ्या मनातलं मळभ निघून गेलं होतं. तात्यांची ती परंपरा मी चालवायला नको का?- तो साराच खुलासा ऐकून मी थक्क झालो.

अण्णा पुढं म्हणाले, "विद्यार्थिनीची गोष्ट एवढ्या बारकाईनं कोण वाचणार, ही तुमची शंका बरोबरच होती. आपण असं समजूया की, अंक छापून झाला; पण तो वाटायचा राहून गेला. तरीसुध्दा आपल्या सहीनं जे छापलं जाईल, ते आपल्या कुवतीप्रमाणे बरोबर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातूनही एखादी चूक न कळत राहून जाण्याची शक्यता असते. कारण आपलं ज्ञान तसं अपूर्णच असतं. त्यामुळं आपल्या हातून सर्वस्वी निर्दोष अशी कृती सिध्द होणं अवघड असतं. पण आपल्या समजुती प्रमाणं ती बिनचूक करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आपल्या हातात हे आणि एवढंच असतं!"

अण्णांच्या सहवासातल्या या दोन आठवणी अतिशय बोलक्या आहेत. शिकवणी लावून बाहेरच्या जगात जे मला शिकता आलं नसतं, असं बरंच काही अण्णांकडून मला शिकायला मिळालं. व्यवसाय निष्ठेचे संस्कार त्यांनी मला दिले. अध्यापन हे आपलं जीवनव्रत (मिशन) आहे, ही निष्ठा त्यांनी मला दिली.

अण्णांचं सौहार्द हे माझं पाथेय ठरलं!

लेखकाचा पत्ता:
'संतोष', भारतीनिवास कॉलनी
६०/१५ एरंडवणा,
पुणे - ४११००४.



नाशिक येथे वनाची पाहणी करताना प्रा. सरदार, वनविकास महामंडळाचे अधिकारी व मानवविज्ञान परिषदेचे सदस्य.

# ऐसे बोलणे मनी साठवावे

## गजानन शं. खोले

निदान जागृत अवस्थेत तरी माणसाचे मन कधी रिकामे असू शकत नाही. त्यामध्ये काही ना काही तरी विचार सुरू असतातच. कुटुंबातील बऱ्या वाईट घटना धन- व्यवसाय- राजकारण- प्रवास- हेवेदावे अशा स्वरूपाचेच विचार सर्वसामान्य माणसाचे मनात घोळत असतात. परंतु तत्त्वज्ञांचे मनात मात्र अईनिष अपसुकच सुविचारांचे चिंतन-मनन सुरू असते. अन् ते सहज गप्पागोष्टी करत नाही. त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत असते. असे जे बोलणे असते ते मनात कायमचे साठवूनंच ठेवले पाहिजे नाही कां? कै. प्रा. गं. बा. सरदार यांचे व्यक्तिमत्व अशांपैकीच एक होते.

किंरिंग ऽऽ किंरिंगऽऽ किंरिंगऽऽ

'सकाळ' मधिल टेबलावरील टेलीफोनची घंटी वाजली, अन् मी रिसिव्हर उचलला.

...'खोले - प्रा. गं. बा. सरदार बोलताहेत.' आमच्या ऑफिसाचे टेलिफोन ऑपरेटर श्री. पटवर्धन यांनी मला सांगितलं. ...आणि क्षणार्धात टेलिफोनच्या रिसिव्हरमधून माझ्या कानात शब्द जाऊ लागले....... ''मीऽ गं. बा. सरदार बोलतोय, मला गजानन खोल्यांशी बोलायचंय...''

''ऽ मीऽ खोलेच बोलतोय ... काय आज्ञा...''

''ऽ आज्ञा कसली आलीय होऽ पण माझं जरासं काम आहे. .... क्रांतीवीर उमाजी नाईक यांच्या जीवनचरित्रावर तुम्ही 'झुंजार' नावाची कादंबरी लिहीली आहेत, असं मला ग्रथालयातून समजलं. पण ती त्यांच्याकडं नाही. कुणी प्रकाशित केली आहे तीऽ मी ती त्यांच्याकडून आणून घेईन. येथे रामोशी समाजउन्नती मंडळ अशा काहीतरी नावाची संस्था आहे. येत्या ३ फेब्रुवारीला त्यांनी मला उमाजींच्या हुतात्मा दिनानिमित्त बोलावले आहे. मी जाणार आहे. परंतु त्यापूर्वी त्यांचे चरित्र वाचून जावे, म्हणून ग्रंथालयात तपास केला होता''....असं अतिशय शांत स्वरात प्रा. सरदार फोनवरून सांगत होते.

ऽ तसं म्हटलं तर सरदारांचा आणि माझा घनिष्ठ परिचय नव्हता. 'सकाळ'चा वार्ताहर म्हणून कधीकधी ८-१० वेळा त्यांच्याकडे आलो-गेलो होतो एवढंच. पण असे असले तरी संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक आणि विचारवंत म्हणून मी त्यांना ओळखत होतो, त्यांच्याविषयी माझ्या मनात नितांत आदराची भावना होती. त्यामुळे त्यांच्या सारख्या ऋषी माणसाने माझ्यासारख्या एका सामान्य लेखकाला फोन करावा अन् तोही माझ्या कांदबरीबाबत, या सर्व भावना क्षणार्धात मनाला चाटून गेल्या अन् ते सुखावलंही! आणि मी त्यांच्याशी बोलू लागलो.....

ऽ....''सरदारसाहेब, होऽ ही 'झुंजार' कादंबरी मी लिहीलेली आहे. अन् 'इंद्रायणी साहित्य'चे श्री. श्यामराव कोपर्डेकर यांनी ती प्रकाशित केली आहे. आता तिच्या प्रती पार संपून गेल्यात ..हो.. पण संग्रहासाठी तीन प्रती मी ठेवलेल्या आहेत, त्यातील एक आपल्याला सायंकाळी चारला आणून देतो.''

ऽ....''तुम्हांला तसदी पडेल हो ऽऽ'' ते

ऽ "तसदी कसली आलीय त्यात? आपल्यासारख्याला माझी कादंबरी देणे यासारखा तिचा अन्य सदुपयोग तो कोणता?"

ऽ यावर किंचीत स्मित करीत ते म्हणाले, "ठीक आहे ऽ मग या तर तुम्ही चार वाजतां"

ऽ फोनचा रिसिव्हर ठेऊन मग मी माझ्या घरी गेलो. 'झुंजार' ची एक प्रत काढून ठेवली. अन् सायंकाळी चारला ती घेऊन डेक्कन जिमखान्यावरील हॉटेल श्रेयस नजिकच्या त्यांच्या निवासस्थानी गेलो. धोतर आणि अंगात सदरा घातलेल्या सरदारांनी, 'या ऽऽ' असे मृदु शब्दात म्हणत माझे स्वागत केले. माझी 'झुंजार' कादंबरी त्यांच्या हातात देऊन मी त्यांना वाकून नमस्कार केला आणि खूर्चीवर बसलो. दहा-बारा मिनिटे त्यांनी कादंबरी चाळून पाहिली. आणि कांदबरीचा शेवट मी ज्या इंग्रजी मजकूराने केलेला आहे तो मजकूर त्यांनी दोन वेळा वाचून काढला. हा शेवट असा आहे...... I may observe here, (as it is on record), that it was the opinion of the inhabitants of the country that Oomiah aspired to empire, and that he kept in view the conduct and that he kept in view the conduct and line of proceedings pursued by Sewajee the founder of the Maratha state. However times and circumstances were very different. He was a man of low caste, but he possessed much shrewdness, inteligence, activity and would have proved a most useful partisan to native Goverment during a peroid of discontent and confusion .....

पुण्यातील खडक मामलेदार कचेरीच्या आवारात असलेल्या पिंपळाच्या झाडाला गळफास देऊन जाहीररित्या ३ फेब्रुवारी १८३२ रोजी दुपारी बारा वाजता उमाजी नाईकला फाशी देण्यात आले.

ऽ उमाजी नाईकाने मोठे सैन्य स्थापन करून ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते. त्याला पकडण्यासाठी कॅप्टन मॅकींटॉश या गोऱ्या मोठ्या अधिकाऱ्यांची सरकारने खास नियुक्ती केली होती. आणि आपल्यातील फितुरीमुळे उमाजी त्याच्या हाती लागला गेला. याच् मॅकिंटॉशने सन १८३३ मध्ये स्वत:ची डायरी प्रसिध्द केली आहे, ती फक्त उमाजीच्या संदर्भातीलच आहे. वरील उतारा हा त्या डायरीतील आहे.

ऽ चार वर्षापूर्वी ३ फेब्रुवारीला पुण्यातील रामोशी समाजउन्नति मंडळाने उमाजींचा हुतात्मा दिन साजरा करण्याचे ठरविले होते. पुणे जिल्हा परिषद कार्यालयाच्या अलिकडे एक शिवालय किंवा श्रीविष्णू मंदिर आहे. त्या तिथे मोठे सभागृह आहे, त्यामध्ये हा कार्यक्रम त्यांनी आयोजित केला होता. त्यासाठी मलाही त्यांनी आमंत्रण दिलेले होते.

ऽ झुंजार मधिल वरील उतारा वाचून झाल्यावर मजकडे पाहात सरदार म्हणाले, "१८५७ मध्ये स्वातंत्र युध्द झाले होते. पण त्यापूर्वी २५ वर्षे आपल्या सासवडच्या या वीराने हे स्वातंत्र्य युध्दच केलेले होते. केवढा मोठा माणूस हा..." ....या कादंबरीची प्रस्तावना माझ्या विनंतीला मान देऊन सुप्रसिध्द् लेखक-लेखिका पती-पत्नी, श्री. भा.रा. भागवत आणि सौ. लीलावती भागवत यांनी लिहिलेली आहे. कांदबरी चाळता चाळता त्या दोन्ही नावावर सरदारांची नजर गेली ..... अन् लागलीच त्यांनी ती प्रस्तावनाही वाचून काढली. आणि मला म्हणाले, "मी ही कादंबरी आजच पाहतोय् - आता ती वाचून काढीनंच- पण हे एक चांगले काम तुमच्याकडून झालेले आहे. यांत शंकाच नाही."

ऽ असं बोलता बोलता त्यांनी सुरूवातीची तीन-चार पाने परत चाळली आणि उठून उभे राहात कोट ठेवलेल्या जागेकडे जात मला म्हणाले, ''कादंबरीचे मूल्य वीस रूपये आहे नांऽ थांबा देतो हं. ''.....

ऽ ......असं म्हणत ते आत जाऊ लागणार होते, तोच मी त्यांना म्हटले, ''नाही सरदारसाहेब. मी आपल्याला ही कांदबरी भेट दिली आहे. त्यात माझा आनंद आहे. मी तिचे पैसे घेणार नाही. आपण तसे म्हणूही नका. नाहीतर मला दु:ख होईल. ''.....मग मात्र ते परत खाली बसले. अन् म्हणाले, ''ठीक आहे, मी तुमचा आनंद हिरावून घेऊ इच्छित नाही. ''

ऽ यानंतर ते स्वत: होऊनंच सांगू लागले, ''लोक मला भाषणांसाठी बोलावतात, पण मी आता फारसा जात नाही, प्रकृती साथ देत नाही. पण मागासलेल्या समाजातील कार्यकर्ते बोलवायला आले की मी सहसा नकार देत नाही. त्यांच्याकरतां मी दुसरं काय करू शकणार ? असा विचार मनात येतो अन् म्हणून उमाजीच्या हौतात्म्य दिनाचे आमंत्रण मी स्वीकारले आहे....

....त्यानंतर , ''एक विचारू का साहेब'' असं म्हणत मी म्हणालो, ''कुठेही आणि कोणत्याही विषयावरील भाषणाला जायचे असले की आपण संदर्भ पाहून जात असतां ? किंवा कसे ? ''

ऽ .....होय ती माझी एक सवय आहे..... असं म्हणत ते सांगू लागले....ज्ञानेश्वर- रामदास- तुकाराम- इतकेच काय गांधीजी यासारख्या विषयांवर जरी कुठे भाषण द्यायचे असले तरी मी एक दोन दिवस आधी त्यावर काय बोलावे याचे मनात चिंतन करू लागतो ऽ किंबुहना ते अपसुकच होऊ लागते म्हटलात तरी चालेल ! अन् मग त्यासाठी संदर्भाचीही गरज पडते, मी मग ग्रंथ आणतो टिपणे काढतो भाषण कुठंही असो, ते ठोकून द्यावे, टाळ्या मिळवाव्या वर्तमानपत्रातून ते छापून आले की समाधान मानावे, हे मला पटत नाही. भाषण हे जरी श्रोत्यांसाठीच असते तरी त्यातून त्या वक्त्यालाही आत्मिक समाधान लाभले पाहिजे. वर्तमानपत्रे जरी आपले विचार मोठ्या प्रमाणावर समाजापर्यन्त पोहोचविणारी माध्यमे असली तरी त्यांनी आपल्या भाषणाला किती जागा दिली ? किंवा अजिबात दिली नाही, यावर त्याचे मूल्यमापन त्या वक्त्याने तरी करता कामा नये. व्याख्यान देणे म्हणजे श्रोत्यांशी तो एक प्रकारचा सुसंवाद साधणे होय. व्याख्यान ऐकताना श्रोत्यांच्या चेहऱ्यावरील भावना लक्षात घेऊन त्यांची मने समजून घेतली पाहिजेत आणि आपल्याला समाजाला बरोबर घेऊन त्याचा विकास साधण्याचा प्रयत्न करावराचा आहे, हे धोरण वक्त्याने ठेवले पाहिजे....''

ऽ यानंतर मग इकडच्या-तिकडच्या थोडद्या गप्पागोष्टी झाल्यावर मी त्यांचा निरोप घेतला.

ऽ ठरल्याप्रमाणे ३ फेब्रुवारीला सायंकाळी ४ वाजतां उमाजी नाईकांच्या कार्यक्रमासाठी मी नियोजित सभागृहात गेलो. सरदारही आले होते. त्यांच्या उपस्थितीत माझे व आणखी काही जणांची भाषणे झाली. मुख्य अतिथी प्रा.सरदार होते. वीर उमाजी नाईकाच्या प्रतिमेला पुष्पमाला घालून ते म्हणाले, ''मला उभे राहावत नाही, म्हणून मी खूर्चीत बसूनच बोलतो, याबद्दल क्षमा असावी. ''

ऽ नंतर त्यांनी उमाजीच्या पूर्वकालापासून ते फाशी दिनांकापर्यन्त त्यांच्या उज्वल चरित्रावर सुंदर भाषण केले. आणि भाषणाचा समारोप करताना माझ्या झुंजार कांदबरीतील त्यांनी खूण घातलेले पान क्रमांक ७२ काढले व ते श्रोत्यांना दाखवित म्हणाले, ''उमाजी निरक्षर होता. त्यामुळे ब्रिटिशांचे चोरून आणलेले टपाल त्याला इतराकडून वाचून घ्यावे लागत असे. पण ही चोरी देशाचे

भले करण्यासाठी होती. पुढे उमाजी एका दरोड्यात पकडला गेला. त्याला शिक्षा झाली. पुण्याला तुरूंगात ठेवले. तेथून सुटल्यावर परत स्वातंत्र्याच्या लढ्यातच स्वत:ला झोकून देण्याचा तेथेही त्याचा मनसुबा होता. तुरूंगात थोडी उसंत मिळाली होती, तेथेही चोरून मारून तो ग-ग गणपतीतला, असे शिकू लागला. केवढे मोठे हे विद्येचे प्रेम. ते आपल्या मनात निर्माण झाले पाहिजे. या समाजातील मुलामुलींनी शिकले पाहिजे. त्यांच्या पालकांनी त्यांना शाळेत पाठविले पाहिजे. घरची गरीबी असेल तर दिवसा मिळेल तो कामधंदा करा आणि रात्रीच्या शाळेत जा. पण शिका. आता सरकार आपले आहे, ते देत असलेल्या सवलतींचा फायदा करून घ्या. मोठे व्हा. हीच खरी उमाजी नाईकांना आपली श्रध्दांजली ठरणार आहे.....

ऽ यानंतर आभार प्रदर्शन वैगेरे उपचार होऊन कार्यक्रम संपला.

ऽ या गोष्टीला आता चार वर्षे लोटून गेली आहेत. सरदारांच्या सहवासातील ही आठवण अजूनही माझ्या मनात ताजी आहे. ही आठवण पुढे कधी लिहावी लागेल असे वाटलेही नव्हते. केवळ स्मृतीपटलांच्या आधारे ती लिहून काढली आहे. यामुळे त्यातील एकाद दुसरा शब्द कदाचित् पुढे मागे होण्याची शक्यता असू शकते, परंतु त्यातील भावार्थाला मात्र अजिबात धक्का लागलेला नाही. तसेच हा लेख माझ्या व्यक्तिगत आठवणीवर आधारीत असल्याने त्यामध्ये ' मी ' येणे अपरिहार्य आहे. तथापी तो कारणपरत्वे आणि व्याकरणापुरताच आणलेला आहे, त्यामागे ' ग ' ची भावना अजिबात नाही. असो. ' संगतीने घडे - पंगतीचा लाभ ', असे संत वचन आहे. सरदारांच्या छोटयाशा संगतीत मला जो लाभ झाला त्यामध्ये काही विचारधन साठवलेले आहे. यानिमित्ताने ते सांगण्याचा प्रयत्न करावा, हाच या शब्दप्रपंचामागील उद्देश !

पत्ता

१९८३, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी
पुणे - ४११०३०. दूरध्वनी ४३५१४

दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी, जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल, तर तिला पाठींबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.

**गं. बा. सरदार**

# लामणदिवा लावण्यापूर्वीच विझला...

प्रा. ए. एम. मोदी

सकाळच्या वेळी 'सकाळ' वरून नजर फिरवीत होतो. पुरोगामी विचारवंत, प्रबोधनाचे उद्‌गाते प्रा. गं. बा. सरदार यांचे निधन झाल्याचे वर्तमान पाहिले. मनामध्ये एक क्षणभर दु:खाची छाया पसरली, व एका होऊन गेलेल्या कार्यक्रमाचे स्मरण झाले.

काही दिवसांपूर्वीच पुण्याच्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात सरदारांच्या 'परंपरा व परिवर्तन' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पार पडला. मी व माझे एक प्राध्यापक मित्र त्या कार्यक्रमास मुद्दाम हजर होतो. मुंबई विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरू व प्रसिध्द कायदेपंडित प्राचार्य टोपे; गोखले एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी प्राचार्य मो. स. गोसावी, मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य शिवाजीराव भोसले, या मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होत होता. सरदार कुटुंबीयही या कार्यक्रमास हजर राहिले होते. वयाने व प्रकृतीने थकलेले सरदार प्रबोधन विचार व्यक्त करताना मात्र कधी थांबले नाहीत, थबकले नाहीत. महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा वस्तुनिष्ठ व मूलगामी अभ्यास करणारा हा थोर विचारवंत 'प्रबोधनाच्या पाउलखुणा' स्वतंत्रपणे एकाकी वाटचाल करीत तयार करीत राहिला. स्वत:च्या निखळ, पारदर्शक व तरीही स्वतंत्र विचारांचे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले.

त्या कार्यक्रमात आपल्या सत्काराला उत्तर देताना आण्णासाहेब आपल्या छोट्याशा भाषणात म्हणाले, ''सध्याचे समाजजीवन हे वेगाने पुढे जात आहे. त्यात वेगवेगळे प्रवाह येऊन मिसळत आहेत; त्या सर्वांचा आपण मोठ्या मनाने स्वीकार केला पाहिजे. आजच्या दलितसाहित्यातून लगेच 'कालीदास' निर्माण होईल असे मानू नका. तो त्याचे जीवनानुभव स्वत:च्याच शब्दात व्यक्त करतो आहे. ते आपण स्वीकारले पाहिजेत. बदलत्या परिस्थितीनुसार आपण बदलले पाहिजे. केवळ अलिप्तता ही आपल्याला क्षमा करणार नाही.''

आण्णासाहेब महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनात तुमचे स्थान अटळ आहे. सारा महाराष्ट्र आपला ऋणी राहील. येथे मला प्रा. निर्मलकुमार फडकुले यांनी संपादित केलेल्या 'प्रबोधनाच्या पाउलखुणा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेची आठवण होते. व पुनर्लेखनाचा दोष पत्करून देखील ती या ठिकाणी नमूद करावीशी वाटते, ''सहज मनात असा विचार येतो की आजचा समाज संदेहाच्या धुक्यात गुरफटून जात आहे. कोणत्याही मूल्यांना बिनदिक्कत मुरड घालीत आहे; अथवा त्याची मोडतोड करीत आहेत. अशा वेळी त्याच्या आचार विचारात, आदर्शात, जीवनदृष्टीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांच्या पाठीवरून सहानुभूतीने हात फिरवून, 'हडबडू नका, गडबडू नका' असे आश्वासन देणाऱ्या लोकांवर मन:पूर्वक प्रेम करणाऱ्या प्रबोधनकाराची अत्यंत आवश्यकता आहे. बौध्दिक अहंगंडाने पछाडलेले शब्दपंडित हे काम कसे करू शकतील ? त्यांचा स्वत:चाच तोल गेलेला असतो. प्रज्ञा आणि सहृदयता यांच्या मिलाफातून ज्यांच्या शब्दांना जीवनकला आली आहे, असे लेखक, विचारवंत-समीक्षक आज हवे आहेत. सरदारांच्या

व्यक्तित्वाकडे लक्ष गेले की, अशा व्यक्ती महाराष्ट्रात आहेत याची प्रसन्न जाणीव होते. मनाला आधार वाटतो.''

(प्रबोधनातील पाउलखुणा-प्रस्तावना, पान २४)

या प्रा. फडकुले यांच्या मनोगतात कसलीही भर घालावी लागणार नाही, इतके ते समर्पक व यथार्थपणे सरदारांचे पुरोगामी प्रबोधनकार म्हणून केलेले प्रांजल प्रतिपादन आहे; कसलेही 'पीठ' किंवा 'पद' आपल्या भोवती निर्माण न करता हा पारदर्शक माणूस शेवटपर्यंत विचारांवर प्रेम करीत राहिला. गोरगरिबांना आवश्यक असणारी सहृदयतेची कणव पुरवीत राहिला.

आण्णासाहेबांचा सत्कार करताना त्या कार्यक्रमात प्राचार्य टोपे म्हणाले होते, ''हा लामणदिवा आम्ही त्यांना प्रेमाचे प्रतीक म्हणून भेट देत आहे. या लामणदिव्याच्या प्रकाशात आण्णासाहेबांनी अखंड लेखन, व चिंतन करावे. व त्यांच्या हातून प्रबोधनाचे काम अव्याहतपणे चालू रहावे हीच अपेक्षा व त्यांना त्यासाठी शंभर वर्षाची साथ मिळावी दिर्घायुरारोग्य व स्वास्थ्य लाभावे.'' आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केलेली ही भावना; किंवा प्रमुख पाहुणे प्राचार्य शिवाजीराव भोसल्यांनी- शब्दांसाठी धावणारा, त्यांची वाट पाहणारा, आपले विचार अचूक, मार्मिक व अर्थपूर्ण-शब्दात व्यक्त करणारा एक सारस्वत व एक प्रगल्भ विचारांचा खंदा पुरस्कर्ता म्हणून केलेला त्यांच्या लेखणीचा गौरव; या दोन्ही गोष्टींना महाराष्ट्र आज पारखा झाला. माणसांची इच्छा व नियतीची इच्छा ह्या दोन ध्रुवाच्या टोकासारख्या कधीही जवळ न येणाऱ्या किंवा फलद्रुप होणाऱ्या नसतात. नियतीचा न्याय सर्वांनाच लागू आहे. आज आण्णासाहेब आपल्यात नाहीत पण त्यांनी प्रबोधनाच्या कर्माचा जो वारसा चालू केला आहे. तो पुढे कार्याच्या रूपाने चालू राहिला पाहिजे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक जडण घडणीत ज्या समाज धुरिणांनी आपली जबाबदारी पार पाडली त्याचा वैचारिक मागोवा घेऊन त्यातील नेमकेपणा आण्णांनी स्वीकारला, समाज जीवनाचे अभिसरण घडत असताना, जात, पंथ, भेदाभेद, धर्म, पक्ष, या सगळ्या अडथळ्यांना दूर ठेवून केवळ मानव जातीचे कल्याण या एकाच आग्रहाने आण्णासाहेबांनी आपली लेखणी झिजविली. त्यांच्या काही पुस्तकांचा उल्लेख जरी केला. तरी त्याची प्रचिति येते. 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी', 'संत वाङमयाची सामाजिक-फलश्रुती' 'ज्ञानेश्वरांची जीवन निष्ठा', 'आगरकरांचा सामाजिक-तत्वविचार' ही पुस्तके व 'संक्रमणकाळाचे आव्हान' हे संपादित केलेले पुस्तक म्हणजे समाज प्रबोधनाच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे आहेत. आण्णासाहेबांनी लेखन केले ते मोजकेच पण त्या लेखनाचे सांस्कृतिक व वैचारिक मूल्य मात्र अजोड, अमूल्य आहे. कारण त्यांनी स्वतःची एक जीवननिष्ठा उभी केली व प्रत्यक्ष तसे ते जगले.

स्वतः श्रीमंत व समृद्ध घरात जव्हार येथे जन्माला आलेले आण्णासाहेब - गरिबांची कणवन सहृदयता घेऊन सतत वावरत होते. त्यांनी व्यापार केला तो विचारांचा, मोजमाप केले ते मूल्यांचे परिवर्तनाचे, माणूस म्हणून माणसाइतके मोठे काहीच नाही, व कुणीच नाही. तो दबला जाऊ नये चिरडला जाऊ नये म्हणून आण्णासाहेब नेहमी दक्ष असत. आपल्या लेखणीने प्रहार करीत राहिले. कुठेही आक्रोश नाही, आक्रंदन नाही, होता तो विवेकी विचार व पारदर्शक विचारमंथन.

दिवसेंदिवस महाराष्ट्रातून माणसे दिसेनाशी झाली. ज्यांच्या कार्याचा वारसा चालविला गेला पाहिजे, ती व्यक्तिमत्त्वे लोप पावू लागली. आण्णासाहेब कर्वे गेले, महिलांचा उध्दारकर्ता गेला. कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ 'आण्णा' गेले, बहुजन समाजाचा शैक्षणिक उध्दारकर्ता

आपल्यातून निघून गेला. आज आण्णासाहेब-तुम्हीही गेलात,....महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचे कार्य हेच आपले जीवीत ध्येय मानणारा हा जव्हारचा सुपुत्र, आदिवासी लोकांच्यावर पितृवात्सल्याने प्रेम करणारा हा सहृदयी, सद्गृहस्थ आपल्यातून निघून गेला.

लामणदिवा लावण्यापूर्वीच विझला.पण...नाही तो दिवा आण्णासाहेबांचे स्मरण करून पेटवू या व त्यांनी घालून दिलेली ही प्रबोधनाची वाटचाल पुढे चालू ठेवू. आण्णासाहेब उभ्या महाराष्ट्राचे तुम्हाला शतशः प्रमाण.

पत्ता :
'रोहन' १६९ बारस्कर गल्ली,
शुक्रवार पेठ, फलटण, जि. सातारा ४१५५२३



नाशिकच्या आदिवासी आश्रमशाळेतील मुलांना पुस्तक वाटप करताना प्रा. सरदार व शेजारी वनविकास महामंडळाचे प्रमुख श्री. मरबल्ली.

# गं. बा. सरदार - प्रबोधनाचे प्रवक्ते

## के. डी. पाटील

गं. बा. सरदार हे एक विचारवंत होते. हे साम्यवादी होते. शिवाय त्यांच्या विचारांवर गांधीवादी विचाराची छाप होती. भारतीय परिस्थितीचा विचार करून प्रबोधनाचे कार्य करणारे विचारवंत असे त्यांचे वर्णन करता येईल. विशेषत: समाजातील समाज-परिवर्तनाच्या क्षेत्रात काम करीत असलेल्या तरूणांचे ते प्रबोधनकार आणि मार्गदर्शक होते. ते नेहमी सांगत की, भारतीय समाजाचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी साम्यवादी विचाराप्रमाणे फक्त वर्गवादाचाच विचार करून चालणार नाही. तर जाती व्यवस्थेवर आधारलेल्या भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी वर्णवादाचा विचारही अपरिहार्य मानावा लागेल. म्हणून भारतात वर्गवाद आणि वर्णवाद या दोहोंचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. यासाठी समाजातील वर्ग नष्ट करणे आणि समाजातील वर्णव्यवस्था नष्ट करणे या दोन्ही कार्यांचा समन्वय साधण्याच्या कार्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली आहे.

गं. बा. सरदार यांच्या विचारात पोथीनिष्टपणा नव्हता. यामुळेच त्यांचे तरूणांना योग्य मार्गदर्शन होत असे. त्यांचे लातूर येथे भरलेल्या विषमता निर्मूलन परिषदेतील भाषण, बार्शी येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले भाषण आणि कोल्हापूर येथे समाज परिवर्तनाच्या क्षेत्रात काम करीत असलेल्या तरूणांना मार्गदर्शनपर भाषण ऐकण्याचा योग आला होता. या त्यांच्या सर्व भाषणात वास्तववादीपणा प्रकर्षाने जाणवला. शिवाय त्यांच्यामध्ये समाजप्रबोधनाची आत्यंतिक तळमळ आढळून आली. यामुळेच ते तरूणांचे मार्गदर्शक आणि आशास्थान बनले होते. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांवरूनही त्यांची प्रबोधनाची तळमळ स्पष्ट होते.

गं. बा. सरदार यांची लोकशाहीवर निष्ठा होती. ते लोकशाही मानणारे होते. यामुळेच बहुतेक तरूणांच्या शिबीरार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांचा पाचारण केले जात असे. अशा शिबीरांना ते आवर्जून हजर रहात व मार्गदर्शन करीत असत. त्यांची विचार मांडण्याची पध्दती शास्त्रशुध्द, वास्तववादी आणि आकर्षक असे, हेच गं. बा. सरदार यांचे वैशिष्टय आहे. यामुळेच प्रबोधनाच्या कार्याच्या इतिहासात प्रबोधनाचे प्रवक्ते म्हणून गं. बा. सरदार यांचे नांव अजरामर राहणार आहे.

पत्ता :
करंदीकरवाडा ( हिरमेठाजवळ )
ब्राम्हणपुरी, मिरज.
जि. सांगली

# प्रा. गं. बा. सरदार साहित्य-सूची

## संकलन : श्रीमती संगीता पुराणिक

(अ) स्वतंत्र ग्रंथ

(१) **अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका**
(इ. स. १८००-१८७४)
आवृत्ती पहिली : गं. बा. सरदार, पुणे, १९३७.
आवृत्ती दुसरी : पुनर्मुद्रण, मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९५६.
आवृत्ती तिसरी : मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९७१.

(२) **महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी**
आवृत्ती पहिली, गं. बा. सरदार, पुणे, १९४१.
आवृत्ती दुसरी, पुनर्मुद्रण, सुनंदा प्रकाशन, पुणे, १९६१.

(३) **जोतीराव फुले**
स्वाध्यायमाला क्र.४७, अ. वि. गृह प्रकाशन, पुणे, १९४५.

(४) **संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती**
आवृत्ती पहिली, महाराष्ट्र साहित्य परिषद-प्रकाशन, पुणे, १९५०.
आवृत्ती दुसरी, (दोन लेखांची भर) म. सा. परिषद-प्रकाशन पुणे, १९६५.
आवृत्ती तिसरी, म. सा. परिषद-प्रकाशन पुणे, १९७०.
आवृत्ती चौथी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८४.

(५) **संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी**
(पु. मं. लाड स्मारक व्याख्यानमाला, १९६२ व १९६३)
प्रकाशन विभाग, भारत सरकार, दिल्ली, १९६५.

(६) **Saint-Poets of Maharashtra : Their Impact on Society**
Translated by Dr. Smt. Kumud Mehta.
Orient Longmans Ltd, Delhi, 1969.

(७) **ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा**
कौशिक व्याख्यानमाला, स. प. महाविद्यालय, पुणे, १९७१.

(८) **न्या. रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा**
सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७३.

(९) **आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार**
व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७५.

(१०) **अध्यक्षीय भाषण** (पुस्तिका)
मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन, मुंबई,
अधिवेशन २१ वे, २५ ऑक्टोबर १९७५.

(११) **प्रबोधनातील पाऊलखुणा** (प्रा. गं. बा. सरदारांचे निवडक लेख)
संपादक, डॉ. निर्मलकुमार फडकुले, कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८.

(१२) **अध्यक्षीय भाषण** (पुस्तिका)
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अधिवेशन ५४ वे, बार्शी, जिल्हा सोलापूर,
१ फेब्रुवारी १९८०.

(१३) **महात्मा फुले : विचार आणि कार्य.**
ग्रंथाली प्रकाशन, पुणे, १९८१.

(१४) **नव्या युगाची स्पंदने** (प्रा. सरदारांच्या निवडक निबंधांचा संग्रह)
संपादक : डॉ. प्र. चि. शेजवलकर, प्रकाशन : श्री अभय शं. भावे.
संजय प्रकाशन पुणे. (प्रथमावृत्ती : ऑक्टोबर १९८४)

(१५) **महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल,**
प्रथमावृत्ती : संपादक : वसुधा सरदार, पुणे.
प्रकाशक : र. गो. करमरकर. नवनिर्माण प्रकाशन,
मु. पो. पारगाव-सालुमालु, ता. दौंड. जि. पुणे, १९८६.

(१६) **नव्या ऊर्मी, नवी क्षितिजे** (प्रा. सरदारांचे समाजपरिवर्तनपर निवडक लेख) संपादक : डॉ. ल. रा. नसिराबादकर
प्रकाशक : अभय शं. भावे, संजय प्रकाशन, पुणे, १९८७.

(१७) **परंपरा आणि परिवर्तन** (प्रा. सरदारांचे स्फुट लेख)
संपादक : प्रा. वि. शं. चौधुले आणि डॉ. मो. स. गोसावी
प्रकाशक : चिटणीस, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९८८.

(पुण्यास दि. २ ऑक्टोबर १९८८ रोजी, म्हणजे प्रा. सरदारांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी, त्यांच्या उपस्थितीत हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्या वेळी आपल्या भाषणात ते म्हणाले. ''स्फुट स्वरूपात प्रसिध्द झालेले माझे सर्व उर्वरित लेख या ग्रंथात आले आहेत. माझा एकही लेख ग्रंथनिविष्ट व्हायचा आता राहिलेला नाही.'')

### (आ) संपादित ग्रंथ

(१८) **महाराष्ट्र जीवन :** परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड १,
जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.

(१९) **महाराष्ट्र जीवन :** परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड २,
जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०

(२०) **संक्रमणकाळाचे आव्हान**
जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६६.

(२१) **Golden Jubilee Commemmoration Volume**
SNDT Women's University, Bombay, 1968.

(२२) **तुकाराम दर्शन** अर्थात अभंगवाणी प्रसिध्द तुकोबाची, मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९६८.

( २३ ) **रामदास दर्शन**
मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९७२.

( २४ ) **एकनाथ दर्शन**
मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९७८.

**( इ ) प्रा. सरदारविषयक ग्रंथ**

( २५ ) **साहित्यविचार आणि समाजचिंतन**
( प्रा. गं. बा. सरदार षष्टयब्दपूर्ती गौरव ग्रंथ )
संपादक : डॉ. भालचंद्र शंकर भणगे
प्रकाशक : ओरिएन्ट लाँगमन्स लि. निकल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई १
प्रथमावृत्ती : २ ऑक्टोबर १९६८.

( २६ ) **प्रा. सरदार साहित्य समालोचन**
संपादक : डॉ. हेमन्त विष्णु इनामदार
आणि
डॉ. लक्ष्मण रामदास नासिराबादकर
प्रकाशक : मॉडर्न बुक डेपो, १२ बुधवार पेठ, पुणे,
प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९८०.

( २७ ) **प्रबोधनाचे प्रवक्ते : प्रा. सरदार**
लेखिका : डॉ. सौ. सुनंदा गोसावी.
प्रकाशक : चिटणीस, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९८६.

२८ ) **गांधी आणि आंबेडकर**
प्रा. गं. बा. सरदार ( स्वतंत्र ग्रंथ )
सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८७
पुनर्मुद्रण - १४ एप्रिल १९९०.

**पत्ता :**
आशीर्वाद, भारतीनिवास कॉलनी
१०७ / १८ एरंडवणे, पुणे
४११००४



# प्रा. गं. बा. सरदार : जीवनपट

## ( काही ठळक वैशिष्टे )

आधुनिक प्रबोधनाचे व पुरोगामी चळवळीचे भाष्यकार, ख्यातनाम साहित्यिक, समाजमनस्क व कृतिशील विचारवंत. २० ग्रंथ प्रकाशित.

| | | |
|---|---|---|
| जन्म | : | २ आक्टोबर १९०८ - ठाणे जिल्ह्यात जव्हार गावी. |
| १९२४ | : | मुंबई विद्यापिठात मॅट्रिक्युलेशन. |
| १९३० | : | मीठाच्या सत्यागृहात सहभाग. |
| १९७५ | : | मुंबईच्या व उपनगरीय मराठी साहित्य संमेलनाच्या २१ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष. |
| १९७६ | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या कार्यात सहभाग. |
| १९७८-८३ | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष. |
| १९७८ | : | १४ जानेवारी. मुंबई येथील दलित साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष. |
| १९८० | : | बार्शी येथील ५४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. |
| १९८१ | : | प्रवरानगर येथील ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. |
| १९८२ | : | पिंपरी ( पुणे ) येथे झालेल्या भटक्या विमुक्त जाती संघटनेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष. |
| १९८३ | : | २ आक्टोबर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या वतीने प्रा. सरदारांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्ट - चिंतन सोहळा. |
| १९८४ | : | ‘ रामशास्त्री प्रभुणे सामाजिक न्याय ’ पुरस्कार. |
| १९८६ | : | १८ जानेवारी ‘ युवा साहित्य समाज ’ आयोजित मुंबई येथील महाविद्यालयीन विद्यार्थी मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या अधिवेशनाचे उद्घाटक. |
| १९८८ | : | २ ऑक्टोबर. वयाला ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार. |
| निधन | : | १ डिसेंबर १९८८. काविळीच्या विकाराने. |

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै. प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : जनार्दन पोहऱ्या वळवी |
| उपाध्यक्ष | : शरद कुलकर्णी |
| सचिव | : रा. के. मुटाटकर |
| सहसचिव | : लक्ष्मण कुलकर्णी |
| खजिनदार | : बाबुल पठाण |
| सदस्य | : श्रीमती मीराबाई तडवी |
| | : श्रीमती छायाताई सुरतवंती |
| | : के. सी. पाडवी ( आमदार ) |
| | : श. गो. देवगावकर |
| | : उल्हास राजज्ञ |
| | : सुधीर जोग |

गं. बा. सरदार



जन्म– २-१०-१९०८ मृत्यू– १-१२-१९८८

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

मानव विज्ञान परिषदेचे सद[illegible]

आजीव सभासद २५० रूपये

परिषद वार्षिक सभासद २५ रूपये

परिषद सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट किंवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर फॉर्म मागे कृपया आपले पूर्ण नाव, पत्ता लिहिण्यास विसरू नये.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा.के.मुटाटकर सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४,आनंद पार्क, औन्ध, पुणे ४११००७

आपल्या क्रियाशील सहकार्यांची अपेक्षा आहे.